म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. २८७५

मुस्लिम जातीयतेचे स्वरूप : कारणे व उपाय

हमीद दलवाई

हमीद दलवाई

# मुस्लिम जातीयतेचे स्वरूप : कारणे व उपाय

REFBK-0016589

साधना प्रकाशन, पुणें २

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

निबंध
७५४९८
१९।३।६९
२०७५

# मुस्लिम जातीयतेचे स्वरूप
## कारणे व उपाय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
निबंध
१९।३।६९
२०७५

हमीद दलवाई

१६५८८
मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रंथालय
समृद्धी योजना
REFBK-0016589

साधना प्रकाशन, पुणे

प्रथमावृत्ती
एप्रिल १९६८
प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनवार, पुणे
मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनवार, पुणे
किंमत
एक रुपया

# प्रास्ताविक

साधना ट्रस्टतर्फे गेल्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतातील हिंदू -मुस्लिम प्रश्नासंबंधी एक जाहीर परिसंवाद योजण्यात आला होता. या परिसंवादात श्री हमीद दलवाई हे सहभागी झाले होते. त्यांनी परिसंवादासाठी जे टिपण तयार केले होते ते पुस्तकाच्या स्वरूपात येथे प्रसिद्ध होत आहे.

हिंदू-मुस्लिम प्रश्न ही भारतीय जातीयतेचीच एक परिणती आहे. हमीद दलवाई म्हणतात की, हिंदूंना सेक्युलर बनवू पाहणारे लोक मुस्लिम जातीयतेची गय करतात, त्या जातीयतेच्या बचावासाठी उभे राहतात आणि मुस्लिम जातीयता निखंदून काढण्यासाठी तत्पर असणारी मंडळी हिंदूमधील जातीयता व सनातनी बुद्धि-विरोध पाठीशी घालतात. भारतातील जातीयतेचा अंत म्हणजेच हिंदू-मुस्लिम समस्येचा अंत होय. पण यासाठी सुबुद्ध आणि सर्वांगीण प्रयत्न झाले पाहिजेत.

हमीद दलवाईंचे हे विवेचन अतिशय मूलग्राही असून त्यावर अनेक पातळींवर चर्चा झाली पाहिजे. गेले वर्षभर श्री दलवाई हिंदू-मुस्लिम ऐक्याचा अभ्यास करीत असून आंतर भारती, कोरगावकर ट्रस्ट, इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम, सेक्युलर फोरम, ‘मराठा,’ ‘मौज’ वगैरेंनी त्यांच्या या कार्याकरता साहाय्य केले आहे.

## अनुक्रम


१ मुसलमानांच्या एकात्मतेमधील मुख्य अडचण ५

२ भारतीय मुसलमानांच्या मनाचा मागोवा १५

३ मुसलमान – तथाकथित राष्ट्रीय आणि जमातवादी २८

४ मानवतावादी आधुनिकता हाच इलाज ४३

ग्रं. क्र. १६५८९

# १ मुसलमानांच्या एकात्मतेमधील मुख्य अडचण

हिंदू–मुस्लिम समस्येतून मार्ग काढण्यासाठी आपण १९४७ साली एक निर्णय घेतला. हा निर्णय योग्य की अयोग्य याची चर्चा मला येथे करावयाची नाही. परंतु एक निर्णय ठरला गेला आहे, आणि प्रश्न तसा अनिर्णित नाही, हे ओघानेच आले. तेव्हा त्याबद्दल आपल्या विचारांचे चर्वितचर्वण आज करण्याची आवश्यकता आहे का? एकदा १९४७ साली आपण एक निर्णय घेतला हे मान्य केल्यानंतर या निर्णयाच्या अंमलबजावणीचा विचार करण्यासाठी आपण एकत्र येऊन विचार करणे उपयुक्त ठरेल. परंतु तो विचार हिंदू-मुस्लिम समस्या या विषयाच्या संदर्भात होऊ शकत नाही; खचितच होऊ शकत नाही. हा प्रश्न सोडवण्यासाठी आपण फाळणीचा निर्णय घेतला, आणि ही फाळणी धार्मिक पायावर झालेली आहे. या उपखंडातील बहुतेक सर्व मुसलमानांनी पाकिस्तान हे आपले वेगळे धार्मिक राष्ट्र करावे, अशी मागणी केली आणि म्हणून देशाची फाळणी झाली. ही मागणी करताना जो सिद्धान्त मांडण्यात आला तो भारतीय हिंदू आणि मुसलमान यांच्यात समान काही नाही हा! या मागणीचे समर्थन करताना पाकिस्तानात हिंदू अल्पसंख्य राहिल्यासच येथे आमचे जीवित सुरक्षित राहील असा दावा केला गेला. थोडक्यात आमच्या सुरक्षिततेकरता (१) मुस्लिम बहुसंख्य प्रांतांतील मुसलमानांचे वेगळे राष्ट्र करावे. (२) त्या राष्ट्रात हिंदू अल्पसंख्याक असावेत.

आणि (३) पाकिस्तानातील मुसलमानांनी भारतीय मुसलमानांकरता त्या देशातील हिंदूंना ओलीस ठेवावे, अशा मागण्या १९४७ साली बहुसंख्य भारतीय मुसलमानांनी केल्या. बहुसंख्य हिंदूंनी या मागणीला, नाइलाजाने का होईना, मान्यता दिली; आणि त्या क्षणी ही समस्या सोडवण्यासाठी एक योग्य किंवा अयोग्य निर्णय घेण्यात आला !

### प्रश्नाचे नेमके स्वरूप

हा निर्णय योग्य की अयोग्य याची चर्चा आपल्याला करता येईल आणि त्या अनुषंगाने या साऱ्याच प्रश्नावर साधक-बाधक विचार करता येईल. पण मला वाटते आपले तसे उद्दिष्ट नाही. हिंदू-मुस्लिम समस्या असा जो विषय आहे तो भारतातील हिंदू-मुस्लिमांपुरता मर्यादित आहे असे मी समजतो. त्याला उपखंडातील हिंदू-मुस्लिम प्रश्नाची व्याप्ती नाही. तशी ती असूनही उपयोगी नाही. कारण या उपखंडातील हिंदू-मुस्लिम प्रश्न हा भारत-पाकिस्तान यांच्यामधील परस्पर संबंधांचा प्रश्न बनला आहे, तो हिंदू-मुस्लिम प्रश्न राहिलेला नाही. त्याला दोन वेगळ्या राष्ट्रवादाच्या आणि त्या राष्ट्रवादामागील प्रेरणाशक्तींच्या संघर्षाचे स्वरूप आलेले आहे. म्हणजे १९४७ साली घेतलेल्या निर्णयाची चर्चा करणे हा पर्याय उरतो.या निर्णयाची चर्चा करणे म्हणजेच त्या निर्णयाच्या बाबतीतील संदिग्धतेची, ते निर्णय स्पष्ट करण्याची, त्याच्या अंमलबजावणीच्या मार्गात असलेल्या अडथळयांची आणि ते अडथळे कसे दूर करता येतील याची चर्चा करायची तर आपण नेमके कोणते निर्णय १९४७ साली घेतले हे एकदा पडताळून पाहाणे आवश्यक आहे. आपण तेव्हा फाळणीचा निर्णय घेतला हीच बाब केवळ महत्त्वाची नाही; ती तर महत्त्वाची आहेच, परंतु त्याचबरोबर उरलेल्या भारताला एकसंध बनवण्याचाही आपण तेव्हा निर्णय घेतलेला आहे. भारतीय मुसलमानांना आणि इतर अल्पसंख्यांकानाही समान नागरिकत्वाचा दर्जा देण्याचा आपल्या नेत्यांनी निर्णय घेतला. समान संधी सर्वांना मिळेल, अशा प्रकारची राज्यघटना अस्तित्वात आली. आणि याहूनही अतिशय महत्त्वाची बाब अशी की, या देशात भिन्न धर्मीय, धर्मनिरपेक्ष असा एकसंध भारतीय समाज निर्माण करण्याचा ( मल्टि

रिलिजस सेक्युलर इंटिग्रेटेड इंडियन सोसायटी ) एक महान निर्णय घेतला. आणि ज्या क्षणी आपण हा निर्णय घेतला त्या क्षणी भारतातील हिंदू-मुस्लिम समस्या माझ्या मते संपली ! मी जेव्हा संपली असे म्हणतो तेव्हा त्याला दोन कारणे आहेत. ( १ ) मुसलमानांना आपण त्यांच्या मागणी-नुसार पाकिस्तान देऊन टाकले आणि हा निर्णय हिंदू-मुसलमान समस्या सुटण्यासाठी घेण्यात आला म्हणून ही समस्या सुटली असे मी मानतो. आणि ( २ ) याहूनही अतिशय महत्त्वाचे कारण हे की, आपण या देशात समान नागरिकत्वावर आधारलेले एक एकसंध राष्ट्र उभारण्याचे ठरवले, वेगळे मतदारसंघ रद्द केले, खास प्रतिनिधित्व काढून टाकले. कोणत्याही धार्मिक सवलती शिल्लक ठेवल्या नाहीत. त्या क्षणीच आपण एका समस्येचा आपल्यापरी शेवट केला. आपल्यापुढील आजची खरी समस्या भारतात सर्वधर्मीय धर्मनिरपेक्ष एकसंध ( सेक्युलर इंटिग्रेटेड ) भारतीय समाज-व्यवस्था कशी निर्मिता येईल ही आहे, 'हिंदू-मुस्लिम समस्या नव्हे ! आणि या उद्दिष्टांच्या मार्गात कोणते अडथळे आहेत, ते कसे दूर करता येतील हा खरा आजचा आपल्यासमोरील प्रश्न आहे. थोडक्यात 'भारतीय धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेतील मुस्लिम समाजाच्या एकात्मतेचा प्रश्न' ( प्रॉब्लेम ऑफ मुस्लिम इंटिग्रेशन इन् द फॅब्रिक ऑफ सेक्युलर इंडियन सोसायटी ) असा हा विषय आहे.

### चर्चेच्या संदर्भातील मुख्य अडचण

या प्रश्नावर मोकळ्या मनाने विचार करणारी, आत्मनिरीक्षणाची सवय असलेली, अंतर्मुख बनलेली, आणि धर्मातीत विचार करणारी मंडळी चर्चेत भाग घेण्यासाठी आवश्यक असतात. मुसलमान समाजात अंतर्मुख बनण्याची पात्रता असलेल्या व्यक्ती बोटांवर मोजण्याइतक्याच सापडतील. न्या. छगला किंवा प्रा. हबीब यांच्यासारख्या व्यक्ती अपवादानेच आढळतात. अशा प्रकारच्या चर्चेला आवश्यक असलेल्या निरपेक्ष, आत्मनिरीक्षणपर बौद्धिक आणि सांस्कृतिक पातळीचा अभाव मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणावर आहे असे मला खेदाने म्हणावे लागते. हा त्या व्यक्तींचा दोष नाही. आत्मनिरीक्षणाची, कठोर सत्ये पारखून पाहण्याची, स्वतःच्या

गुणदोषांच्या प्रकाशात आपल्या समाजाला वळण लावण्याची जी बौद्धिक आणि सांस्कृतिक पातळी समाजाच्या बुद्धिजीवी वर्गात असावी लागते, त्या पातळीचा मुस्लिम बुद्धिजीवी वर्गात अभाव आहे. आत्मनिरीक्षणाची, समतोलपणाची, आणि मनाची कवाडे बंद झालेल्या एका समाजाचे प्रतिनिधित्व करत असलेल्या व्यक्तींची संख्याच त्यांचे पुढारी म्हणवणारात मोठी आहे. अशी माणसे आपल्या गुणदोषांची चर्चा करीत नाहीत, आपलाच हेका पुढे चालवत असतात. ते सर्व एका सुरात तेच ठराविक सिद्धान्त मांडत आसतात. दोष नेहमी इतरांना देत असतात, कारण आपले दोष आकळण्याची पात्रताच त्यांच्यात आलेली नसते. दुर्दैवाने मुस्लिम नेतृत्वात ही पात्रता अद्यापही आलेली नाही. आणि ही पात्रता नसलेली मंडळी जेव्हा या प्रश्नाची उकल करण्याचा आव आणतात तेव्हा त्यातून क्वचितच उकल सापडते ! कारण अशा प्रकारच्या चर्चा घडवून आणण्याचा हेतू या दोन्ही जमातींत ‘ विचारांची अर्थपूर्ण देवाण-घेवाण ’ ( ज्याला इंग्रजीत मीनिंगफुल डायलॉग ) म्हणतात तो सुरू व्हावा हा असतो. चुकीची माणसे चर्चा करू लागली की अशा प्रकारची वैचारिक देवाण-घेवाण सुरू होणार नाही. मतान्ध मने अधिक मतान्ध झाली असल्याचा आपल्याला पडताळा येतो. आणि त्याहून अधिकच कटुता निर्माण होण्याची शक्यता असते. ही समस्या अधिक जटिल बनण्याला आपण कारणीभूत होऊ अशीही शक्यता असते. वातावरणातला तंगपणा वाढवायला कारणीभूत ठरण्याचा संभव नाकारता येत नाही.

### हिंदू-मुस्लिम बुद्धिजीवींतील फरक

मुस्लिम मनाला अंतर्मुख बनण्याची पात्रता लाभलेली नाही, असे जेव्हा तो विधान करतो तेव्हा ही पात्रता हिंदू समाजाच्या बुद्धिजीवी वर्गाने काही प्रमाणात कमावलेली आहे असे मी गृहीत धरतो. हिंदू बुद्धिजीवी वर्ग भावनात्मक प्रवाहात वाहात जायचे नाकारीत असल्याचे दृश्य आपल्याला दिसते. अगदी नुकत्याच झालेल्या गोहत्या-बंदी आंदोलनाचे उदाहरण घेतले तरी ह्या विधानाची सत्यता पटेल. या आंदोलनाला हिंदू

बुद्धिजीवी वर्गातील काही व्यक्ती सतत विरोध करत असल्याचे आपल्याला दिसून येईल. हा विरोध हा बुद्धिजीवी वर्ग कोणत्या भूमिकेतून करतो हा गौण मुद्दा आहे. या विरोधकांच्या भूमिका वेगवेगळ्या आहेत. या देशाच्या सेक्युलॅरिझमशी गोहत्याबंदी विसंगत ठरेल असे अनेकांना वाटते म्हणून ते विरोध करतात, तर काहींना या देशाच्या आर्थिक-शेती प्रगतीच्या आड गोहत्याबंदी येईल असे वाटते व हा आपला विचार ते सतत मांडीत आहेत. थोडक्यात, हिंदू बुद्धिजीवी वर्गातील काही मंडळी गोहत्याबंदीसारख्या धार्मिक आंदोलनाकडेही बुद्धिजीवी दृष्टिकोणातून पाहतात. बुद्धिवादी दृष्टिकोणातून एखाद्या समस्येकडे पाहणे हे खऱ्या बुद्धिवाद्याचे लक्षण मानले गेले पाहिजे. आता हाच निकष आपण तथाकथित मुस्लिम बुद्धिवाद्यांना लावायचा प्रयत्न केल्यास घोर निराशा आपल्या पदरात पडेल. आणि 'मुस्लिम बुद्धिवादी' हा खऱ्या अर्थाने 'बुद्धिवादी नाही' तो फक्त 'मुस्लिम' आहे हे आपल्या लक्षात येईल. मी माझ्या विधानाच्या पुष्टयर्थ आपल्याला दोन उदाहरणे देऊ इच्छितो, म्हणजे माझे म्हणणे स्पष्ट होईल.

## मुसलमानांची वृत्ती

१९५३ साली भारतीय विद्याभवनने थॉमस आणि थॉमस यांच्या लिव्हिंग प्रॉफेट्स या पुस्तकाची संक्षिप्त भारतीय आवृत्ती प्रसिद्ध केली. या पुस्तकात महंमद पैगंबरांविषयी काही चुकीची विधाने केली गेली आहेत असा भारतीय मुसलमानांनी आक्षेप घेतला. तथापि हा आक्षेप घेऊनच ते थांबले नाहीत, त्या पुस्तकावर बंदी घालावयाची त्यांनी मागणी केली. देशात प्रचंड आंदोलन त्यांनी चालविले. हे आंदोलन चुकीचे आहे, आपल्याला मान्य नसलेली मते-अगदी पैगंबरांविषयींची मतेदेखील मांडण्याचा दुसऱ्याला हक्क आहे, या भूमिकेतून या आंदोलनाला विरोध करणारा एकही मुस्लिम विचारवंत देशात पुढे आला नाही! हजरतबाल येथील पवित्र केसाच्या चोरीच्या प्रकरणी देखील हेच दिसून आले. त्या प्रसंगी कुणी तरी मुस्लिम बुद्धिवाद्याने असे म्हणायला हवे होते की, "या केसाला एवढे महत्त्व देण्याचे काही कारण नाही. त्यामुळे काश्मीरची सबंध शासन-यंत्रणा बंद

पडावी हे तर अगदीच चुकीचे आहे. आपण आता थोड्या अधिक महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष देऊ या!" परंतु जाहीरपणे असे एकही बुद्धिवादी म्हणवणारा मुसलमान बोलला नाही!

### आणि हे डरपोक हिंदू!

माफ करा, मला नेमके हे विचार तेव्हा व्यक्त करायचे होते. परंतु मी माझा लेख ज्या संपादकांकडे घेऊन गेलो त्यांनी तो प्रसिद्ध करावयाचे नाकारले. ,'आमच्या कचेरीवर मुसलमानांचा मोर्चा यावा असे तुम्हांला वाटते काय?" असे त्यांनी मला उलट विचारले. हे सद्गृहस्थ हिंदू होते हे मी सांगायची जरूरी आहे असे नाही! हिंदूंची अनेक रूपे अस्तित्वात आहेत. तो अनेक रूपे धारण करतो. हिंदूंमधील बुद्धिवादी वर्गाचा मघाशीच मी उल्लेख केला. त्या वर्गाची स्तुतीही केली. परंतु मला हे स्पष्ट सांगणे आवश्यक आहे की मुसल्मानांपुढे भयभीत होणाऱ्या हिंदूंचे एक रूपही अस्तित्वात आहे! ही गोष्ट लज्जास्पद आहे यात शंका नाही. हा हिंदू नेमक्या कसोटीच्या वेळी मुसलमानांहून आपण अधिक मुसलमान असल्याची बेमालूम बतावणी करतो आणि मुसलमानाला जरा कमी मुसल्मान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या माझ्यासारख्याला तोंडघशी पाडतो!

### बुद्धिनिष्ठांची समाजजीवनातील महती

या दोन जमातींतील बुद्धिवादी वर्गातील हा फरक हाच हा प्रश्न सोडवण्याच्या मार्गातील एक खरा अडथळा आहे. अशा प्रकारचा एक छोटा बुद्धिवादी वर्ग देखील समाजाला इष्ट वळण लावत असतो. एक प्रकारचे संतुलन साधत असतो. समाजाच्या प्रगत चळवळींचे नेतृत्व करीत असतो. सनातनपणाविरुद्ध लढत असतो. नव्या कल्पना, नव्या जीवनमूल्यांचा सतत स्वीकार करीत असतो. आपल्या बुद्धीच्या कसोटीवर घासून त्यातील सत्यता अजमावून पाहात असतो. त्याला स्वतःचे दोष आधी कळायला लागतात, इतरांचे नव्हेत! त्याला अंतर्मुख बनण्याची दृष्टी लाभलेली असते. या दृष्टीने तो निरपेक्ष वृत्तीचा आणि चिकित्सक बनलेला असतो. कुठल्याही समा-

जाच्या प्रगत अवस्थेची लक्षणे ही या वर्गाच्या समाजातील अस्तित्वावरून अजमावयाची असतात--

## रूढ मनोगंडाच्या नेत्यांशी चर्चा अशक्य

परंतु असा वर्ग समाजात सहजासहजी निर्माणही होऊ शकत नाही. अनेक ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय आणि अन्य प्रक्रियांतून अशा वर्गाची निर्मिती होत असते. या प्रक्रियेतून एक प्रकारची सहिष्णू मनोवृत्तीची घडण घडत असते. आणि ही सहिष्णू घडण अशा प्रकारच्या वर्गाला आणि त्या वर्गाने चालविलेल्या आंदोलनाला जन्म देत असते. हिंदू समाज अशा प्रक्रियेतून गेला, तावून-सुलाखून निघाला, आणि एका उदारमतवादी चिकित्सक बुद्धिवादी वर्गाला त्या समाजाने जन्म दिला. मुस्लिम समाज या प्रक्रियेतून अजून गेलेला नाही. तो आता कुठे त्या अवस्थेत प्रवेश करत आहे. आणि म्हणून रूढ युक्तिवादाने भारलेल्या मूढ मनाच्या नेत्यांबरोबर या प्रश्नावर सर्वांगीण वैचारिक देवघेव करण्याचा प्रयत्न यशस्वी ठरण्याची शक्यता फार कमी वाटते.

## सांस्कृतिक पातळीतील दुर्लंघ्य बनलेली दरी

याचा अर्थ मुस्लिम समाजात धर्मनिरपेक्ष वृत्तीने, भावनांच्या प्रवाहात वाहात न जाणाऱ्या बुद्धिवादी व्यक्ती अस्तित्वात नाहीत असा कृपया समजू नका. प्रा. महंमद हबीब किंवा न्या. छागला ही या मुस्लिम मनाच्या प्रागतिक अवस्थेची जिवंत उदाहरणे आहेत. परंतु चार दोन व्यक्ती म्हणजे उदारमतवादी वर्ग नव्हे आणि व्यक्ती समाजावर प्रभाव पाडू शकत नाही, अशा असंख्य व्यक्तींचे उदारमतवादी आंदोलन ते कार्य करू शकते. असे आंदोलन या व्यक्ती मुस्लिम समाजात निर्माण करू शकत नाहीत, कारण त्यांना त्यांच्या समाजात काहीच स्थान नाही. ते ज्या क्षणी उदारमतवादी बनले त्या क्षणी आपल्या समाजाचा विश्वास गमावून बसलेदू असे आढळून येते ! हिंदू उदारमतवाद्यांबाबत असे होत नाही. नेहरू हे याचे उदाहरण आहे. बिहारमध्ये मुसलमानांविरुद्ध १९४६ साली दंगली उसळल्या तेव्हा हिंदूंना मी तुमच्यावर विमानातून बॉम्बवर्षाव करीन अशी

धमकी नेहरूंनी दिली होती. हिंदूंनी तरीही नेहरूंचे नेतृत्व झुगारले नाही. फाळणीनंतर देखील त्यांनी घटना सेक्युलर बनवली, मुसलमानांना समान अधिकार दिले, आणि तरीही हिंदूंचा एक मोठा वर्ग त्यांचे नेतृत्व मानत राहिला.–अशी अनेक उदाहरणे देता येतील. निराद चौधरी या लेखकांबद्दलही हेच म्हणता येईल. निराद चौधरी यांचे नाव किती मुस्लिम मित्रांनी ऐकले असेल ते सांगणे कठीण. आपल्या ' कॉंटिनेंट ऑफ सर्स ' या ग्रंथात त्यांनी आपल्या एका विशिष्ट दृष्टिकोणातून हिंदू मनाच्या अधःपतनाचे विश्लेषण केले आहे. हिंदू हे अधःपतित आहेत असा फटकारा मारला आहे, आणि तरीही त्यांना हिंदू आपल्यातील मानतात. आता अशाच प्रकारच्या मुस्लिम नेत्यांकडे आणि विचारवंतांकडे जरा वळून पाहा. पाकिस्तानला विरोध करणाऱ्या मौ. आझादांची अवस्था काय होती हे आठवणे मनोरंजक ठरेल. हे वीस वर्षांपूर्वीचे उदाहरण झाले. श्री. छागला यांना मुस्लिम समाजात कोणते स्थान आहे? अलीगड विद्यापीठविषयक त्यांनी आणलेल्या विधेयकाने त्यांची कोणती अवस्था झाली हे आपल्याला माहीत आहे! दोन्ही समाजांत जोपर्यंत हा फरक अस्तित्वात आहे तोवर हिंदू-मुस्लिम संघर्षांतील तीव्रता कमी होऊ शकणार नाही, हे आपण शक्य तितक्या लवकर ओळखणे आवश्यक आहे. हा फरक कमी करण्याचा खरा प्रयत्न होणे आवश्यक आहे. कारण हा फरक हा माझ्या मते दोन्ही समाजांच्या सांस्कृतिक पातळीतील फरक आहे. या दोन्ही समाजांत एक प्रकारची सांस्कृतिक दरी अस्तित्वात आहे. ही दरी नष्ट केली गेली पाहिजे. हिंदू समाजाच्या मागे असलेला हा समाज सांस्कृतिक दृष्ट्या हिंदू समाजाच्या बरोबर आणला गेला पाहिजे. तसे होणे म्हणजेच मुस्लिम समाजात एक उदारमतवादी वर्गाची निर्मिती होणे होय; एक उदारमतवादी आंदोलन अस्तित्वात असणे होय.

**नव्या नेतृत्वाच्या उदयाची चाहूल**

आणि म्हणून अशा प्रकारची चर्चा हिंदू आणि मुस्लिम विचारवंत आणि नेते निरपेक्षपणे करण्याचा काळ अजून १०-१५ वर्षे पुढे आहे. या प्रश्नावर त्या वेळी उपयुक्त चर्चा होऊ शकेल. अर्थपूर्ण असा परिसंवाद हिंदू-मुस्लिम

समाजात निर्माण होऊ शकेल. आणि हे जेव्हा घडून येईल, तेव्हा मुसलमान समाजात आवश्यक ते संतुलन निर्माण झालेले असेल. असा वर्ग निर्माण होत असल्याची लक्षणे मला दिसत आहेत. मी हे विधान केवळ आशावादी दृष्टिकोणातून करीत नाही. मला असे वाटते की २० वर्षांनंतर मुसलमान समाजातून एका नव्या नेतृत्वाचा उदय होण्याची शक्यता आहे. हे नेतृत्व मुस्लिम धार्मिक हितसंबंधांचा कैवार घेण्याची भाषा बोलणार नाही, या देशातील, भारतीय समजातील वेगवेगळ्या वर्गांचे आणि थरांचे नेतृत्व करीत असताना ते दिसेल.

### अशी उदाहरणे हवीत

मी आपल्याला एकच उदाहरण देतो. जॉर्ज फर्नांडिस हे धर्माने कॅथॉलिक आहेत. परंतु ते कॅथॉलिक आहेत ही महत्त्वाची गोष्ट नाही. ते श्रमजीवींचे नेते आहेत. ते जी भाषा बोलतात ती गरिबांचा कैवार घेणारी आहे, कॅथॉलिकांची नव्हे! जॉर्ज फर्नांडिस यांच्या कार्याविषयी कुणाचे मतभेद असतील, पण मला येथे फक्त ते कॅथॉलिकांचे प्रतिनिधित्व करीत नाहीत, श्रमजीवींचे करतात, एवढेच सांगायचे आहे. ते इंग्रजीच्या उच्चाटनाची भाषा जेव्हा बोलतात तेव्हा आपण कॅथॉलिक असल्याचे विसरतात, ही महत्त्वाची बाब आहे. मुंबईला यूखॅरिस्ट काँग्रेसमध्ये ते जात नाहीत, त्या काँग्रेसविषयी अगत्य दाखवीत नाहीत. ते धार्मिक वृत्तीचे आहेत की नाहीत हे महत्त्वाचे नाही, ते आपल्या सार्वजनिक कार्यात धर्मकारण आणत नाहीत. मुस्लिम नेतृत्व पुढेमागे अशा प्रकारचे उदयाला येऊ शकेल.

### मार्क्सवाद्यांतील लाचार नेते

आज असे मुस्लिम नेतृत्व अस्तित्वात नाही. आज स्वतःला मार्क्सवादी म्हणवून घेत असलेल्या मुस्लिम नेतृत्वाला देखील सार्वजनिक कार्यात धर्माचा वापर करण्याचा मोह आवरत नाही! पश्चिम बंगालचे उजवे कम्युनिस्ट नेते श्री. महंमद इलियास हे याचे उदाहरण! ते मजुरांचे पुढारी म्हणवतात. तथापि काही महिन्यांपूर्वी त्यांनी हौरा येथील एका वादग्रस्त

जागेत मुसलमानांना नमाज पढता यावी म्हणून एका शुक्रवारी मुसलमानांचा मोर्चा काढला ! या जागेचे प्रकरण कोर्टात गेले आहे हेही येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. महंमद इलियास यांची कोर्टाने निकाल देईपर्यंत थांबायचीही तयारी नाही ! आपण धार्मिक स्वातंत्र्याचे आणि पर्यायाने मूलभूत हक्कांचे संरक्षण करीत आहोत असा त्यांनी आपल्या कृत्याच्या समर्थनार्थ युक्तिवादही केला ! दुसऱ्याच्या खाजगी जागेत (आणि पुन्हा त्या जागेचे प्रकरण कोर्टात गेले असताना ) अतिक्रमण करणे ही जनाब इलियास यांनी धार्मिक स्वातंत्र्याची केलेली ‘ अजब मार्क्सवादी ’ व्याख्या आहे !

◘ ◘

# २ भारतीय मुसलमानांच्या मनाचा मागोवा

खरे म्हणजे भारतीय मुसलमानांच्या प्रश्नाची कारणे आणि इलाज यांचाच ओझरता आढावा मी आरंभी घेतला. ह्या समस्येच्या स्वरूपा-बद्दलचा ऊहापोह मी आधी करायला हवा होता असे कोणी म्हणेल. रोगाची लक्षणे आणि उपाययोजना सांगितली जावी, रोग कोणता ते सांगितले जाऊ नये, तसा काहीसा हा प्रकार घडला आहे. पण मी जाणून-बुजूनच या विषयाला शेवटाकडून आरंभ केला. लोकांच्या लक्षात काही ठळक गोष्टी सुरुवातीलाच आणून देणे हा त्यामागचा एक हेतू होता. हा असा उलटा आरंभ केल्याने अशा बाबतीत होणाऱ्या चुका स्पष्टपणे ध्यानात याव्यात हा या योजनेमागील दुसरा एक हेतू आहे; आणि या प्रश्नाची मोकळ्या मनाने चर्चा करू पाहणाऱ्या मुस्लिम मित्रांनी अंतर्मुख व्हावे आणि सुसंबद्ध आणि मनमोकळेपणाने विचार करावा हा मुख्य हेतू आहे. कारण मुसलमान नेते नेहमी कोर्टात वकिली करीत असलेल्या युक्तिवादासारख्या युक्तिवादाचा नेहमी अशा चर्चेच्या वेळी आश्रय घेत असतात. कोर्टात वकिलाला केस जिंकायची असते. ती युक्तिवादाच्या जोरा-वरच जिंकता येते. हा युक्तिवाद तिसरा एक पक्ष ऐकत असतो आणि तो अखेरीला निर्णय देणार असतो. त्या संबंधित बाबींचा निकाल त्या युक्तिवादाच्या आधारे लागत असतो. उदाहरणार्थ, एखाद्या खून केलेल्या माणसाने खून केलेलाच नाही असे त्याच्या वकिलाने कोर्टात युक्तिवादाने

सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे. येथे न्यायाधिशांना वकील आपली बाजू पटवू शकला तर खून करूनही खुनी निर्दोष सुटण्याची शक्यता असते. मुसलमान नेत्यांचे युक्तिवाद काहीसे अशाच प्रकारचे असतात. त्यांना हा युक्तिवाद करताना कोणता तरी न्यायाधीश आपल्या बाजूने निकाल देऊन आपल्याला सर्व दोषांतून मुक्त करणार आहे असे वाटते की काय, कळत नाही. उदाहरणार्थ, 'फाळणी मुसलमानांनी केलेली नाही' असा एक अजब युक्तिवाद आपल्याला भारतातील सर्व मुस्लिम नेते करताना आढळतात. 'फाळणीला हिंदू जबाबदार आहेत, असाही एक युक्तिवाद केला जातो! आता फाळणीला जबाबदार कोण याबद्दल कदाचित वेगवेगळे युक्तिवाद करता येतील. जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न प्रत्येक करणार. याबाबत मतभेदाला वावही असू शकेल. परंतु मुसलमानांनी फाळणी केली नाही या असत्य युक्तिवादाचा अर्थ काय? हा युक्तिवाद मुसलमान करतात तेव्हा आम्ही फाळणीला जबाबदार नाही, इतकेच त्यांना म्हणायचे नसते. आम्ही मागणीच केली नव्हती असे म्हणायचे असते!

### इतिहासाचा मागोवा

असे ते का करतात याची कारणे थोडी इतिहासात आहेत. मुस्लिम समाजाने नेहमी तिसऱ्या पक्षाच्या साहाय्याने आपल्या मागण्या हिंदूंवर लादण्याचा प्रयत्न केला. हा तिसरा पक्ष ब्रिटिशांचा होता. त्याच्यापुढे प्रभावीपणे बाजू मांडली की त्यांचे काम भागत असे. आपण हिंदू-मुस्लिम प्रश्न सोडवण्यासाठी झालेल्या साऱ्या प्रयत्नांचा इतिहास आठवला तर माझ्या म्हणण्यातील सत्यता आपल्या लक्षात येईल. आमचे समाधान केल्याशिवाय हिंदूंना स्वातंत्र्य मिळू नये असा त्यांनी हट्ट धरला! न्यायाचा तराजू एका तिसऱ्या पक्षाच्या हातात आहे, हे पाहिल्यानंतर आपल्या असत्य आणि बेफाट युक्तिवादाने तो आपल्या बाजूने झुकवण्याचा त्यांनी प्रयत्न केला; आणि पारतंत्र्याच्या शृंखला तुटाव्यात म्हणून अधीर झालेले हिंदू या दांडगट युक्तिवादामुळे हतबल झाले! निर्णय देणाऱ्या तिसऱ्या पक्षाने कसा निर्णय दिला हा प्रश्न महत्त्वाचा नाही. निर्णय तिसऱ्या पक्षाकडून मुसलमानांनी मिळवला, हा महत्त्वाचा प्रश्न आहे! हा निर्णय आपण

आणि बहुसंख्य हिंदू यांनी व्यायचा आहे, असे त्यांनी कधी मानलेच नाही. कारण ते तिसऱ्या एका पक्षाच्या कोर्टात उभे होते! समझोत्याने व तडजोडीने ही केस मिटवावी असे त्यांनी मानले नाही.

### मुसलमानांनी केलेले एक महान पाप!

थोडक्यात, मुसलमानांनी स्वातंत्र्याच्या मार्गात अडथळे आणण्याचे एक महान पाप केले. तिसऱ्या पक्षाच्या अस्तित्वाचा गैरफायदा घेतला. तिसऱ्याचा निर्णय मानला. हिंदूंशी समझोता करण्याचे नाकारले. हा प्रकार या उपखंडातील सर्वच मुसलमानांबाबत झाला. परंतु आता पाकिस्तानातील मुसलमानांच्या बाबतीत म्हणायचे तर अशा प्रकारच्या चुकीच्या चळवळीचे परिणाम त्याला भोगायला लागणारच नव्हते. त्या चळवळीला यश येणे त्याच्या फायद्याचे होते, आणि म्हणून त्याने या चुकीच्या मार्गाने वाटचाल केली असे मानले पाहिजे.

### तिसऱ्या पक्षाचा घेतलेला सहारा

परंतु भारतीय मुसलमानांनी तर याहून दुप्पट गुन्हा केला आहे! ते तिसऱ्या पक्षावरच विसंबले असे नव्हे, त्यांची चळवळ ही बहुसंख्य मुस्लिम प्रदेशाचे वेगळे राष्ट्र करण्याची चळवळ होती! थोडक्यात त्याने आपले प्रश्न सोडवण्यासाठी ब्रिटिश आणि बहुसंख्य मुस्लिम प्रदेशातील मुसलमान या दोघांचा आश्रय घेतला, आणि हिंदूंशी समझोता करण्याचे नाकारले! थोडक्यात आपले प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय मुसलमानांनी ब्रिटिश आणि बहुसंख्य मुस्लिम प्रदेशातील मुसलमान यांच्याशी एक प्रकारचा करार केला. भारतातील मुस्लिमांचे भवितव्य भारतातील बहुसंख्याकांशी तडजोडीने ठरविण्याऐवजी पाकिस्तानातील बहुसंख्यांकांबरोबरील कराराने ठरले!
हा करार काय होता? आमचे प्रश्न सोडवण्यासाठी बहुसंख्य मुस्लिम प्रदेशाचे वेगळे सार्वभौम राष्ट्र निर्माण करावे. त्या प्रदेशात हिंदू अल्पसंख्याक राहावे. तेथे हिंदू अल्पसंख्याक राहिल्यास आमचे येथील स्थान सुरक्षित राहील. याला होस्टेज थिअरी म्हणतात. मध्ययुगीन काळातील क्रूर आणि अमानुष अशा प्रकारांतील हा ओलीस ठेवण्याचा प्रकार

आहे ! अशा रीतीने एका जुनाट क्रूर तत्त्वाचा त्यांनी आपले प्रश्न सोडवण्यासाठी आश्रय घेतला.

**सूडाच्या बनावाला मुक्त वाव**

गंमत अशी की, ओलीस ठेवण्यासाठी म्हणून का होईना, पाकिस्तानात हिंदू राहायला हवे होते, पाकिस्तानने तेही फारसे आपल्याकडे ठेवले नाहीत ! फाळणी हीच मुळी ओलीस ठेवण्याच्या रानटी सिद्धान्ताचा प्रयोग मुसलमानांनी केल्यामुळे झाली. या सिद्धान्ताचे दुष्परिणाम होणे स्वाभाविक होते. या सिद्धांतातून अल्पसंख्याकांचे एकाऐवजी दोन प्रश्न निर्माण होतील; दोन्ही ठिकाणीं अल्पसंख्याकांवर सूड उगवण्याचे राजकारण खेळले जाईल, हा इशारा अनेकांनी तेव्हा दिला होता. एका मुसलमान विचारवंतानेही एक पुस्तक लिहून दिला आहे ! शौकतुल्ला अन्सारी हे त्यांचे नाव. ते ओरिसाचे राज्यपाल. १९४४ साली ‘ पाकिस्तान– ए प्रॉब्लेम ऑफ इंडिया ’ असे एक पुस्तक त्यांनी लिहिले आहे. फाळणी झाल्यास ती अतिशय कटू वातावरणात होईल, आणि मग निर्माण झालेली ही कटुता अनेक पिढ्यांत टिकेल, सहजासहजी नष्ट होणार नाही, असे त्यांनी एक सूचक वाक्य आपल्या पुस्तकात लिहिले आहे. त्यांची भविष्यवाणी किती अचूक ठरली हे आपण प्रत्यक्षच पाहात आहोत !

**भारतीय मुसलमानांनी स्वतः स्वतःला ओलीस ठेवले !**

आता ओलीस ठेवण्याच्या मुस्लिम लीगच्या सिद्धान्तानुसार जेव्हा फाळणी झाली तेव्हाच मुसलमानांनी स्वतःला ओलीस ठेवले ! आता ते तक्रार कशाबद्दल करत आहेत ? ओलीस ठेवणे चुकीचे आहे असे ते म्हणत आहेत काय ? नाही ! ओलीस ठेवण्याचा सिद्धान्त हिंदूंनी वापरायला सुरवात केली ही त्यांची तक्रार आहे ! हिंदूंना हा सिद्धान्त खुपत असल्याबद्दल त्यांना फारशी फिकीर नाही. तो आपल्याला खुपू नये असे त्यांचे म्हणणे आहे ! या सिद्धान्तानुसार भारतात मुसलमानांविरुद्ध दंगे होऊ नयेत अशी तमाम मुस्लिम नेत्यांची मागणी आहे ! पाकिस्तानातील हिंदूंचे काय ? असा प्रश्न तुम्ही विचाराल. परंतु मी आपल्याला आरंभीच सांगितले

की न्यायाची भूमिका घेणारा उदारमतवादी मुस्लिम वर्ग अद्याप निर्माण झालेला नाही. 'पाकिस्तानातील हिंदूंवर अन्याय होतच नाही' अशी भूमिका घेतली की काम भागले! आणि होत असेल तर तो तेथील प्रश्न आहे. आमचा त्याच्याशी काय संबंध आहे? आम्हांला आपण तेथली उदाहरणे का देता? असे ते विचारतात.

### कोर्टात केस पेंडिंग आहे, अशी अद्याप समजूत

प्रश्न उपस्थित होतो तो असा की, पाकिस्तानातील हिंदूंना न्याय मिळतो असे ते खोटे का बोलत असतात? आणि मुसलमानांनी हिंदूंच्या सदसद्विवेकबुद्धीवर विसंबून न्यायाची अपेक्षा बाळगणे आधी का नाकारले? आधी पहिल्या प्रश्नाचे उत्तर देतो. 'पाकिस्तानातील हिंदूंना न्याय मिळतो' अशी भूमिका घेणारे कोर्टात केस अद्याप पेंडिंग आहे असेच गृहीत धरत आहेत. युक्तिवाद गळी उतरवला की आपल्या बाजूने अजूनही तिसऱ्या शक्तीकडून निर्णय लागणार आहे, असा त्यांचा प्रामाणिक समज आहे! तिसरा पक्ष निघून गेला आणि त्याची जागा प्रतिवादीने घेतली आहे, याची साधी जाणीव देखील या लोकांना झाल्ेली नाही! आता न्याय हिंदूंच्या हाती आहे. आणि तो मिळवायचा असेल तर हिंदूंच्या सदिच्छेची जरूरी आहे; त्यांचा विश्वास संपादन करायला हवा आहे. असल्या असत्य वकिली थाटाच्या युक्तिवादाने हा न्याय मिळणार आहे असे या नेत्यांना खरोखर वाटते काय? पण ते याचा विचार करायला तयार नाहीत; कारण त्यांच्या मते मुसलमानांना कोणी तरी तिसरा पक्ष न्याय देणार आहे! त्यासाठी असत्य युक्तिवाद आणि आवश्यक ते दडपण एवढ्याच गोष्टींची जरूरी आहे असे त्यांना वाटते. हा तिसरा पक्ष आता त्यांच्या मते कोणता आहे हे ते स्पष्ट सांगत नाहीत. परंतु पाकिस्तान हा तिसरा पक्ष त्यांच्या मनात वावरत असतो हे कळायला फार खोलात जायची जरूरी नाही!

### स्वातंत्र्यपूर्व काळातील मनोगंड कायम

या सर्व नेत्यांच्या मनाची अवस्था स्वातंत्र्यपूर्व काळातीलच कशी राहिलेली आहे हे मी आपल्याला सांगू इच्छितो. लखनौ येथे मजलिस

मशावरतचे नेते डॉ. फरिदी यांच्याशी बोलण्याची संधी मला काही महिन्यांपूर्वी मिळाली. आपण फार समतोल विचारांचे आहोत, असा फरिदी यांचा दावा आहे. मुस्लिमांच्या चुकांबद्दलही बोलले पाहिजे असे ते मानतात. परंतु गंमत पुढेच आहे. एकदा तुम्ही त्यांच्याशी वादात शिरलात की तत्त्वतः ते जे मानतात ते तपशिलात बरोबर नाकारण्याचा चलाखपणा करत असतात! उदाहरणार्थ, पश्चिम पाकिस्तानातून हिंदूंची जी हकालपट्टी झाली ती का, असा मी प्रश्न विचारला असता वल्लभभाईंनी विमाने पाठवून त्यांना उगाच बोलावले, नाही तर ते आले नसते, असे त्यांनी मला उत्तर दिले! थोडक्यात, अन्याय होता कामा नये; कुणावरही होता कामा नये, हे फरीदींना एकदम मान्य. त्या दृष्टीने ते एकदम सेक्युलर-वादी! आणि तपशिलात शिरलात तर तुम्हांला ते हे सांगतील की हिंदूंवर अन्याय झालेलाच नाही! झाला असेल तर मी त्याचा केव्हाही निषेध करायला तयार आहे! पण अन्याय झाला आहे हे मला पटले पाहिजे!

### मुस्लिम न्यायाच्या विपरीत कल्पना

आता जनाब महंमद इस्माईल हे अ. भा. मुस्लिम लीगचे अध्यक्ष काय म्हणतात ते पाहा! गेल्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी यू. एन. आय. या वृत्तसंस्थेला दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी म्हटले आहे, “पाकिस्तानात हिंदूंना वाईट रीतीने वागवल्याची किंवा त्यांची जबरदस्तीने धर्मांतर करत असल्याची माझी खात्री पटल्यास मी पाकिस्तानची कानउघाडणी करावयास मागेपुढे पाहणार नाही. कारण इस्लाममध्ये असा अन्याय करता येत नाही!” थोडक्यात, पाकिस्तानने असे काही केल्यास ते चूक आहे असे महंमद इस्माईल मानतील. सवाल आहे तो पाकिस्तान असे काही खरोखर करते काय, याचा. तसे ते राष्ट्र करत असल्याची महंमद इस्माईल यांची खात्री पटली पाहिजे. अर्थात ही खात्री पटवायची जबाबदारी तुमची आहे! तुम्ही हे महंमद इस्माईलना कसे ते पटवून द्या. एकदा पटवून देऊ शकलात की पुढचे काम सोपे आहे. महंमद इस्माईल तावडतोब पाकिस्तानविरुद्ध आपली तलवार उपसणार! परंतु थांबा! तसे काही होणार नाही. कारण पाकिस्तान आपल्या देशातील हिंदूंना वाईट

वागवत असले तरी तसे महंमद इस्माईल यांना पटवून देणे तुम्हांला वाटते तेवढे सोपे नाही. कारण तसे काही पटवून घ्यायचे नाही, हे आधीच त्यांनी ठरवून टाकले आहे!

**श्रीप्रकाशांनी दिलेला हवाला**

श्री श्रीप्रकाश पाकिस्तानात हायकमिशनर असताना कराचीला घडलेला एक प्रकार त्यांनी आपल्या 'बर्थ ऑफ पाकिस्तान' या पुस्तकात नमूद केला आहे. एके ठिकाणी एका देवळाचा विध्वंस करण्यात आला! श्रीप्रकाश यांनी ही गोष्ट एका पाकिस्तानी केंद्रीय मंत्र्यांच्या तेथे कानावर घातली व त्यांना देवळाला पोलिसांचे संरक्षण देण्याची विनंती केली. परंतु या मंत्र्यांनी तसे करण्याचे नाकारले! ते काय म्हणाले हे लक्षात ठेवा! "इस्लामने आम्हांला न्याय शिकवला आहे. देऊळ फुटलेच कसे? इस्लामी राजवटीत असे काही होणेच शक्य नाही!"

१६५८८

**कायदेशीर न्याय व इस्लामी न्याय**

श्रीप्रकाश हतबुद्ध झाले. देऊळ फुटले ही वस्तुस्थिती आहे. परंतु इस्लाममध्ये नेहमी न्याय दिला जातो! आणि न्याय हा या एका पालुपदाच्या कसोटीवर घासून पाहण्याचे मुसलमान नेत्यांनी ठरवले आहे, वस्तुस्थितीच्या कसोटीवर नव्हे! पाकिस्तानात हिंदूंच्या विरुद्ध पक्षपात होत असेल. ती वस्तुस्थिती झाली. परंतु, वस्तुस्थिती ही इस्लामच्या तथाकथित न्यायाच्या कसोटीपेक्षा वेगळी असेल तर ती न मानणे हा इस्लामिक न्याय झाला! आणि तुम्ही–आम्ही सामान्य माणसे ज्या न्यायाच्या कसोटीवर अन्याय पारखून पाहतो ती कसोटी मुसलमान पुढारी स्वतःला लावत नाहीत!— इतरांच्या अन्यायाबाबत इस्लामिक न्याय आणि स्वतःवरील अन्यायाबाबत मात्र तुम्ही-आम्ही लावतो तो न्याय, असा या लोकांचा न्यायाबाबतच्या दृष्टिकोणाचा दुटप्पी खाक्या आहे!

**ज. महंमद इस्माइल– पाकिस्तानचे वकील!**

ज. महंमद इस्माईल यांच्यासारखी पाकिस्तानची अधिक उत्कृष्ट वकिली दुसरा कोणी करू शकेल काय? परंतु आपण तशी वकिली करत आहोत

हेच मुळी महंमद इस्माईल मान्य करणार नाहीत ! कदाचित ते त्यांना उमगतही नसावे. ही उदाहरणे एवढीच मर्यादित नाहीत. ‘ आपण शंभर टक्के भारतीय आहोत. या राष्ट्राच्या आशाआकांक्षांशी समरस झालेले आहोत, राष्ट्रभक्तीत इतरांहून काकणभर कमी नाही, आणि या देशातील बहुसंख्य हिंदूंना देशबांधव मानतो ’ असे तावातावाने सांगणाऱ्या या मुस्लिम नेत्यांचे प्रत्यक्ष वर्तन आणि विचार काय दर्शवितात ? आपण शंभर टक्के देशभक्त आहोत असा दावा सांगत असतानाच काश्मीरवरील पाकिस्तानचा दावा कसा बरोबर आहे, हेही ते सांगत असतात ! भारतातून पाकिस्तान्यांची हकालपट्टी झाली पाहिजे असे म्हणतात, आणि त्याच सुरात आसाममध्ये घुसलेले पाकिस्तानी हे पाकिस्तानी नसून भारतीयच आहेत, अशी भूमिका घेत असतात ! नागरिकत्व ठरवणारे देशातील सारे कायदेही त्यांना अमान्य असतात हे ओघानेच आले. ते भारतीय आहेत हे सिद्ध करण्यासाठी कोणताही आचरट युक्तिवाद तयारच असतो ! हिंदूंशी आपले काही भांडण नाही, असे सांगत असतानाच ‘ नेहरूंच्या मृत्यूनंतर कुराण वाचन झाले हे चूक झाले. कारण काफिराच्या मृत्यूनंतर कुराणाचे वाचन करणे धर्मसंमत नाही ! ’ असेही फतवे दिले जातात ! झाकीर हुसेन त्यांना राष्ट्रपती व्हायलाही हवे असतात, परंतु त्यांनी हिंदीतून शपथ वाचणे आणि शंकराचार्यांचे आशीर्वाद घेणे ही कृत्ये सच्चा मुसलमानाला शोभेशी नाहीत, ही देखील भूमिका लगेच घेण्यात येते ! पाकिस्तानची निर्मिती कशी बरोबर होती हे सांगत असतानाच आमचा पाकिस्तानशी काय संबंध आहे ? इतर मुस्लिम देशांसारखाच तोही आम्हांला परका देश आहे असेही त्यांच्याकडून सांगण्यात येते ! पाकिस्तानच्या शांतताविषयक हेतूंची ग्वाही द्यायची तर या मुस्लिम नेत्यांत अहमहमिका लागलेली असते ! मग अडथळा कोणाचा आहे ? अर्थातच भारतीय नेत्यांचा ! त्यांना पाकिस्तानची निर्मिती खटकलेली आहे, आणि म्हणून ते पाकिस्तानशी शत्रुत्वाने वागतात ! काश्मीरसाठी पाकिस्तान भांडण करते. ते दिल्यानंतर भांडणाचे काही कारणच उरणार नाही ! अर्थात ते न देऊन पाकिस्तानशी भारतानेच शत्रुत्व चालवले आहे !

परंतु ही मते एवढ्यावरच थांबलेली नाहीत हेही मी आपल्याला सांगू इच्छितो. जमायते इस्लामी या नावाची भारतीय मुसलमानांची एक संघटना आहे, आणि भारतात इस्लामिक राज्य स्थापन करणे हे या संघटनेने आपले उद्दिष्ट ठरवले आहे. या संघटनेच्या ' रेडियन्स ' या इंग्रजी पत्राने लिहिले होते, " भारतातील धार्मिक संघर्ष सहजासहजी मिटणारे नाहीत. जेव्हा भारतातील सर्व लोक एका धर्मांचे बनतील तेव्हाच भारतातील धार्मिक संघर्ष संपुष्टात येईल ! "

### हिंदूंच्या विरुद्ध प्रचंड जेहाद करणारे जातीय मुसलमान

' रेडियन्स 'मध्ये प्रकट करण्यात आलेल्या या विचारांच्या संदर्भात मी आधी उद्धृत केलेल्या पुढाऱ्यांच्या विसंगत भूमिकेचा आपण आता अर्थ लावायचा प्रयत्न करा म्हणजे मग एक गोष्ट लक्षात येईल ती ही की मुस्लिम नेत्यांनी हिंदूंच्या विरुद्ध एक प्रचंड जेहाद सतत चालवला आहे ! हा जेहाद सर्वजण मुसलमान होतील तेव्हा संपणार आहे ! आणि हे उद्दिष्ट साधण्यासाठी आवश्यक त्या सर्व कोलांटया उड्या मारण्याची सिद्धता त्यांनी केली आहे. आपण भारतीय आहोत हे त्यांचे म्हणणे खरेच आहे, कारण सबंध भारतावर आपल्याला प्रभाव गाजवता आला पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे !

### पाकिस्तानच्या मागणीची साखळी

मुसलमानांनी पाकिस्तानची मागणी का केली ? कारण आपला समाज हे एक वेगळे राष्ट्र आहे असे ते मानत होते म्हणून ! ते जीनांच्या मागे का गेले ? कारण जीनांनी घेतलेल्या हिंदूविरोधी भूमिकेने त्यांना आकर्षित केले म्हणून. जीना जोवर द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडत नव्हते तोवर मुसलमानांनी जीनांचे नेतृत्व मानले नव्हते, हेही या संदर्भात आपण विचारात घेणे आवश्यक आहे ! याची कारणे स्पष्ट आहेत. मुसलमानात अतिशय तीव्र अशा हिंदूविरोधी भावना अस्तित्वात होत्या. जीनांनी त्यांना फुंकर घालताक्षणीच त्यांनी जीनांना साथ दिली. भारतीय मुसलमानांनी

तर आपण पुढे येथेच राहणार आहोत; अल्पसंख्याक राहणार आहोत, याचाही या धार्मिक भावनेच्या त्या उद्रेकात विचार केला नाही!

### पाकिस्तानच्या पाठिंब्यामागील भाबडा आशाळभूतपणा

परंतु सर्व भारतीय मुसलमानांचा पाकिस्तानला दिला गेलेला पाठिंबा केवळ भावनात्मक लाटेतच सापडून दिला गेलेला नाही. ओलीस ठेवण्याचा सिद्धांत हे या पाठिंब्याचे एक कारण. त्याचबरोबर येथे मुस्लिम सत्ता येईल अशी समजूतही या पाठिंब्याच्या मुळाशी तितकीच प्रबळ होती. पाकिस्तान-खेरीज उरलेला भारत एकसंध होणार नाही ही मुसलमानांची कल्पना होती. जीनांचे पाकिस्ताननिर्मितीच्या वेळचे डावपेच लक्षात घ्या! राजस्थान-मधील संस्थानांना पाकिस्तानमध्ये सामील व्हावयास प्रवृत्त करणे, जुनागड सामील करून घेणे, हैद्राबादला बंडखोरीला प्रवृत्त करणे, भारतातच दंगे होत आहेत असा आरडाओरडा करून पाकिस्तानातील त्यांच्या प्रतिक्रियांकडे मुद्दाम कानाडोळा करणे. मुसलमानांना काय वाटत होते? हैद्राबाद स्वतंत्र होईल. भोपाळही. जुनागड तर पाकिस्तानात गेलेच होते! काश्मीर बहुसंख्य मुसलमानी राज्य असल्यामुळे ते पाकिस्तानचेच! सारी संस्थाने स्वतंत्र होतील, भारतात सामील व्हायचे नाकारतील! भारताची शकले होतील आणि पाकिस्तान किंवा पर्यायाने मुसलमान या परिस्थितीचा पूर्णपणे फायदा घेऊ शकतील असे त्यांचे भाकीत होते! हे भाकीत पुढे खोटे ठरले. ते खोटे ठरवण्याबाबतीत वल्लभभाईंनी संस्थाने विलीन करून मोठा वाटा उचलला. आणि म्हणून मुसलमानांचा वल्लभभाईंवर राग! वल्लभभाईंनी हिंदूंना पाकिस्तानातून आणवले या फरीदींच्या उद्गारांचा आता आपण येथे योग्य तो अर्थ लावू शकतो!

### अद्याप फाळणीपूर्व मनःस्थितीच कायम

मुसलमान समाज आज कोणत्या मनःस्थितीत आहे? माझ्या मते फाळणीपूर्व मनःस्थितीतून तो अजून बाहेर पडलेला नाही! मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो. मी आग्र्याला गेलो होतो. तेथे काही सुशि-क्षित मुस्लिम तरुण भेटले. त्यांना मी एकच प्रश्न विचारला तो असा की,

" आज तुम्ही तुमच्याबद्दल हिंदू संशय व्यक्त करतात अशी तक्रार करता. फाळणीचा हा परिणाम अपरिहार्य होता. भारतातील मुस्लिम सुशिक्षित वर्गाला फाळणीचे दुष्परिणाम का कळू शकले नाहीत ?"
त्या तरुणांनी दिलेले उत्तर मोठे मजेदार होते. ते म्हणाले, " आम्ही भारतात नेहमी अल्पसंख्य राहिलो असतो. नेहमी शासन बहुसंख्यांच्या मर्जीनुसार चालते. आमचे काहीच चालले नसते !"

## बहुसंख्य होण्याची दिवास्वप्ने

आता हे उत्तर आजचे भारतीय मुसलमान कसे देऊ शकतात, हे मला कुणी समजावून सांगू शकेल काय ? कारण आजही तो अल्पसंख्याकच आहे. नव्हे, अधिकच अल्पसंख्याक झाला आहे! परंतु ते जेव्हा असे उत्तर देतात तेव्हा आपण बहुसंख्य हिंदूंच्या वर्चस्वापासून मुक्त झालो आहोत अशीच त्यांनी कल्पना करून घेतलेली असते ! वास्तविक पाकिस्तानी मुसलमानांच्या तोंडून हे उत्तर आले तर ते समजण्यासारखे आहे. परंतु जे उत्तर पाकिस्तानी मुसलमानांनी द्यायला पाहिजे ते भारतीय मुसलमान देत असतात ! याचे कारण स्पष्ट आहे. ते मानसिक दृष्ट्या स्वतःला पाकिस्तानी समजत असतात ! आणि आपण खरोखरच मुक्त झालो आहोत असा समज करून घेत असतात ! तो करून घेतल्याने तर पाकिस्तानने आपली मुक्तता करावी अशी त्याची दुसरी इच्छा असते; आणि म्हणून असत्य, भंपक युक्तिवाद यांचा आश्रय ते घेत असतात. ज्यांना तसा आश्रय घेणे जमत नाही ते हिंदू आम्हांला न्यायाने वागवीत नाहीत अशी तक्रार करीत असतात !

## मुसलमानांचा चमत्कारिक गंड

थोडक्यात अल्पसंख्याक म्हणून एखाद्या देशाच्या राष्ट्रवादाशी जुळवून घेण्यास मुसलमानांचा विरोध असतो ! ते अल्पसंख्याक राहतील म्हणून त्यांना पाकिस्तान हवे होते; आणि पाकिस्तान निर्मितीमुळे या उपखंडातील मुसलमानांचा प्रश्न मिटणार नाही हेही त्यांना माहीत होते. एका इस्लामी नियतकालिकाने नुकतेच म्हटले आहे, " फाळणीने काही भारतीय मुसल-

मानांचा प्रश्न तरी सुटला; इतरांचा अजून सुटायचा आहे!" फाळणीनंतर केलेल्या एका वक्तव्यात ज. सुऱ्हावर्दी म्हणाले होते, "फाळणीने पाकिस्तानातील मुसलमानांचाच प्रश्न सुटला आहे. भारतीय मुसलमानांचा प्रश्न सोडवावयास आता लागले पाहिजे!" त्याआधी कलकत्याच्या एका जाहीर सभेत ते म्हणाले होते, "इज पाकिस्तान अवर लास्ट डिमांड? आय वुइल नॉट ट्राय टु आन्सर धिस क्वेश्चन, बट आय कॅन से, दॅट इज अवर लेटेस्ट डिमांड.– पाकिस्तान ही आमची अखेरची मागणी आहे काय? मी याचे उत्तर देणार नाही. मी एवढेच म्हणेन की ती आमची या क्षणाची ताजी मागणी आहे."

फाळणीनंतर कॉरिडर ही लेटेस्ट डिमान्ड ठरेल. या सगळ्या त्या त्या वेळच्या लेटेस्ट डिमान्ड असतील. आपण विचाराल, लास्ट डिमान्ड कोणती? सबंध हिंदुस्थान ही! सध्याची लेटेस्ट डिमान्ड काश्मीर ही आहे' त्यानंतरची आसाम ही ठरणार आहे! भुत्तोंनी या बाबतीत केलेले व्यक्तव्य आपण वाचले असेल असे मी ग्रहीत धरतो.

पाकिस्तानशी आपला काही संबंध नाही असे तावातावाने सांगणाऱ्या सर्व भारतीय मुस्लिम नेत्यांनी भुत्तोंच्या या विधानावर खरे म्हणजे तुटून पडायला हवे होते. परंतु त्यांनी निषेधाचा ब्र देखील काढलेला नाही हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे!

### भारतात इस्लामी राज्य हा मुसलमानी तोडगा

मुसलमानांच्या मते भारतातील मुसलमानांचा प्रश्न कसा मिटेल? भारतात इस्लामी राज्य स्थापन करून! जमाते इस्लामी त्याकरता प्रयत्न करीतच आहे. ते जमले नाही तर काय करायचे? भारतातल्या सार्वभौम राज्यान्तर्गत अशी मुसलमानांची सार्वभौम सत्ता प्रस्थापित करणे! स्टेट वुइदिन द स्टेट, ए सॉव्हरिन सोसायटी वुइदिन ए सॉव्हरिन स्टेट– एका सार्वभौम राज्यान्तर्गत दुसरे एक सार्वभौम राज्य, आणि एका सार्वभौम समाजांतर्गत दुसरा एक सार्वभौम समाज प्रस्थापित करणे! मजलिसे मशावरतचा नऊ कलमी कार्यक्रम पहा. मुसल-

मानांच्या बाबतीत या देशातील शासनाला आणि लोकसभेला कसलाच अधिकार असता कामा नये, अशी या नऊ कलमान्वये मशावरतने मागणी केली आहे! सलाउद्दीन ओयेसी नावाचे आंध्र विधान सभेचे एक सदस्य आहेत. " प्रत्येक घटक राज्यात मुसलमानांची वेगळी घटक राज्ये असावीत " अशी त्यांनी जाहीर सूचनाच केली आहे!

▣ ▣

# ३ मुसलमान : तथाकथित राष्ट्रीय आणि जमातवादी

मुसलमानांवर भारतात अन्याय होतो असे सर्वच मुसलमान नेत्यांचे म्हणणे आहे. परंतु त्यांची अन्यायाची व्याख्याच फार वेगळी आहे. भारतात हिंदू बहुसंख्य आहेत हाच मुसलमानांवर एक प्रचंड अन्याय चाललेला आहे असे त्यांना सुचवायचे असते ! एरवी स्वतःच्या जमातीला सार्व-[illegible] अधिकार [illegible] संगती लागू शकत नाही. हा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्यापरी चालवला आहे ! आसामात घुसलेले पाकिस्तानी हे पाकिस्तानी नाहीत असे म्हणणे हा त्यातला एक प्रकार ! " भारतात बिहार, पश्चिम बंगाल आणि इतर काही राज्यांत बेकायदा राहिलेल्या पाकिस्तान्यांना भारतीय नागरिकत्वाचे अधिकार द्या " असे सांगणे हा दुसरा प्रकार ! कुटुंब-नियोजनाला विरोध करणे हा तिसरा ! अलीगढ विद्यापीठाच्या एका प्राध्यापकांनी तर मला चक्क तोंडावरच सांगितले, " हिंदू आम्हांला असेच अल्पसंख्याक ठेवतील असे समजू नका ! कॅनडाचा इतिहास आठवा ! क्वेबेकचा प्रश्न कसा उपस्थित झाला पाहा ! तेथील इंग्रज लोक प्रॉटेस्टंट आहेत. ते कुटुंब-नियोजन करतात, कॅथॉलिक असलेले फ्रेंच करत नाहीत, करत नव्हते. त्यामुळे त्यांची लोकसंख्या अधिक वाढली. त्यांनी आपल्या हक्कांचे संरक्षण करायला सुरुवात केली. आम्हीही तसेच करू. आज नाही पन्नास वर्षांनी करू. पन्नास नाही तर शंभर वर्षांनी करू. हा देश इस्लामच्या लाटेत

बुडवून टाकू !" हे प्राध्यापक महाशय स्पष्ट बोलले. इतर नेते लबाडीने बोलतात! "आमच्या धर्मात कुटुंब-नियोजन मंजूर नाही. आम्हांला धार्मिक स्वातंत्र्य द्या" असे ते म्हणतात. हेतू तोच, भाषा तेवढी वेगळी आहे!

### 'दावत'चा सूचक दावा

'दावत' या उर्दू पत्राने तर गेल्या जनगणनेच्या अहवालावर भाष्य करताना असे स्पष्ट म्हटले आहे की, "भारतातील मुस्लिमांची लोकसंख्या हिंदूंच्या तुलनेने गेल्या दहा वर्षांत २२ टक्क्यांनी अधिक वाढली! मुस्लिमांना त्यामुळे आपल्या भवितव्यासंबंधी निराश होण्याचे काही कारण नाही!"

### जातीयवादी मुसलमानांची मजल!

वरील उदाहरणे ही काही मूठभर लोकांची वैयक्तिक मते आहेत असे समजण्याची चूक आपण करू नये. मी गेले काही महिने भारतभर फिरत आहे. वेगवेगळ्या थरांतील मुसलमानांना भेटत आहे. मला भेटलेल्या प्रत्येक ठिकाणच्या दहांपैकी नऊ लोकांची मते मला अशाच प्रकारची आढळली आहेत! आणि काहींनी तर याहूनही पुढची मजल मारली असल्याचे मला आढळले! "हम इस मुल्कके मालिक थे! आप हमको गुलाम बनाना चाहते हैं?" असे त्यांनी माझ्या विचारांना उत्तर देताना मला सुनावले. "मग यावर तुमचा मार्ग कोणता?" असा मी प्रश्न विचारला असताना त्यांनी काय उत्तर दिले माहीत आहे?

ते म्हणाले, "मुकाबला! हिंदूओंसे मुकाबला! हम औरभी मुकाबला कर सकते हैं!"

"मग का करत नाही?" मी विचारले.

"आप हमारा साथ दीजिये! सब मुसलमान इकठ्ठे हो गये तो यूं हिंदूओंको हरा देंगे! मुसलमान अपने इमानसे भारी से भारी दुष्मनोंको भी शिकस्त दे सकते हैं! यह इस्लामकी तवारीख है! बदरके लडाईका जरा ख्याल कीजिये!"

बदरच्या लढाईचा मामला असा आहे!

मित्रहो! बदरची लढाई हे काय प्रकरण आहे, हे जरा समजावून द्या! बदरची लढाई ही इस्लामची पहिली लढाई! या लढाईत पैगंबरांना विजय मिळाला. त्यांचा पक्ष अल्पसंख्याक पक्ष होता. त्यांच्यामागे ३१० कडव्या निष्ठेचे मुसलमान होते. त्यांचे प्रतिस्पर्धी– त्यांच्या विरुद्ध चालून आलेल्या मदिन्याच्या कुरेश टोळीवाल्यांची फौज– हजार बाराशे होती. आता हा विजय कसा मिळाला? हा एक मतभेदाचा विषय होऊ शकेल. परंतु विजय मिळाला, हा इतिहास आहे. आणि हा विजय, हा समरप्रसंग, ही घटना, इस्लामच्या इतिहासाला आणि जगाच्या इतिहासाला वळण लावणारा एक महान प्रसंग ठरला आहे हे नाकारण्यात अर्थ नाही! मुसलमानी मने या विजयाने भारून गेलेली असतात! युद्धातील जय–पराजयाची शास्त्रीय मीमांसा आपण करीत असतो, अशी मीमांसा बाबर–राणा संग, अब्दाली–मराठे इत्यादी भारतातील काही लढायांबाबत करतो. बाबरच्या तोफा तुल्यबळ ठरल्या, हा शास्त्रीय मीमांसेचा एक प्रकार झाला. अब्दाली–मराठे युद्धातील मराठ्यांच्या लष्करी नेतृत्वातील उणीवा, डावपेचातील उणीवा, पानपतच्या ज्या रणांगणावर मराठी सैन्य उभे राहिले त्या मैदानाची रचना, उदाहरणार्थ,– ज्या तीन लढाया पानिपतवर झाल्या त्या साऱ्या लढायांत ज्या पक्षांना विजय मिळाले त्या साऱ्यांनी एका विशिष्ट दिशेने सैन्य उभे केले होते. अकबराचे सैन्य, बाबरचे सैन्य, किंवा अब्दालीचे सैन्य एका विशिष्ट जागेवर लढाईसाठी उभे राहिले. त्या दिशेला एक टेकडीवजा घाट आहे. आणि ही गोष्ट लढाईत निर्णायक ठरली आहे. त्या बाजूने लढाईला उभे राहण्यात मराठ्यांनी चूक केली असे एका लष्करी तज्ज्ञाने म्हटले आहे. परंतु ही शास्त्रीय मीमांसा झाली. मुसलमानी मन शास्त्रीय मीमांसा जाणत नाही! त्याला या प्रत्येक ठिकाणी बदरच्या लढाईची पुनरावृत्ती झालेली आढळून येते! अब्दालीला विजय का मिळाला? कारण तो मुसलमान होता म्हणून! मराठ्यांचा पराभव का झाला? कारण ते काफर होते म्हणून! मूठभर मुसलमानांचे विजय का झाले? कारण त्यांच्या धर्मनिष्ठा प्रबळ असतात म्हणून! मग अरब–इस्रायल युद्धात अरबांचा पराभव का झाला? कारण त्या लढाईतील अरबांचे नेते खऱ्या अर्थाने

धर्मश्रद्ध मुसलमान नव्हते म्हणून! हे नेते म्हणजे नासेर! नासेर धर्मश्रद्ध नाहीत म्हणजे काय? कारण ते शरीयतचे राज्य इजिप्तमध्ये प्रस्थापित करत नाहीत! मूठभर मुसलमानांनी भारतावर हजार वर्षे राज्य कसे केले? ते प्रबळ धर्मनिष्ठेने भारलेले होते म्हणून! मुसलमानांच्या हातात पुन्हा सत्ता येण्यासाठी काय केले पाहिजे? त्यांना धर्मनिष्ठ बनवले पाहिजे!

**असे आहेत राष्ट्रीय मुसलमान डॉ. सय्यद महमूद**

मुसल्मानांनी हातात सत्ता पुन्हा घ्यायची ती केवळ मुसल्मानांच्याच हिताकरता नव्हे! निदान मजलिस मशावरतचे डॉ. सय्यद महमूद तसे समजत नाहीत. डॉ. सय्यद महमूद हे एक पूर्वीचे कॉंग्रेसवादी मुस्लीम नेते आहेत! थोडक्यात ते 'राष्ट्रीय मुसल्मान' आहेत. राष्ट्रीय मुसल्मान नावाची एक अजब चीज आपल्या राष्ट्रीय जीवनात गेली अनेक वर्षे वावरत आहे. या सर्व राजकारणाचा एके काळी मी जेव्हा भोळसरपणे विचार करत होतो तेव्हा राष्ट्रीय मुसल्मान नामक या प्राण्यांबद्दल मी अती आदर बाळगत होतो, हे मला मान्य करणे भाग आहे! आता अधिक विचार केल्यानंतर 'राष्ट्रीय मुसलमान' हा डोके आणि शेपूट नसलेला, परंतु अत्यंत धोकेबाज असा अक्करमाशी प्राणी असल्याचा दाट संशय मला येऊ लागला आहे. डॉ. सय्यद महमूद हे एक त्यातील राष्ट्रीय मुसल्मान. मी त्यांना दिल्लीला भेटलो. विचारले, "आपण मजलिस मशावरत कशाकरता स्थापन केलीत? मुसल्मानांना एका वेगळ्या व्यासपीठावर कशाकरता संघटित करत आहात?"

त्यांचे आरंभीचे उत्तर समंजसपणाचे होते. "दंगे होतात. दंगे झाल्यानंतर मुसल्मान त्याविरुद्ध आवाज उठवतात; परंतु अधिक काही होत नाही! हे दंगे थांबले पाहिजेत. मुसलमानांना सुरक्षितता वाटली पाहिजे. या राष्ट्राच्या जीवनात आपल्यालाही काही स्थान आहे असे त्यांना वाटले पाहिजे. याकरता आम्ही हा उपक्रम केला!"

अर्थात डॉ. सय्यद महमूद यांच्या वरील विचारांबद्दल कोणाही समंजस माणसाचे आक्षेप असणार नाहीत. फार तर या उद्दिष्टाकरता मुसल्मानांना एका व्यासपीठावर आणण्यात आले पाहिजे का, हा मतभेदाचा मुद्दा

ठरेल. परंतु सय्यद महमूद एवढेच म्हणून थांबले नाहीत. ते मला पुढे म्हणाले, " और तुम तो यह देख रहे हो के मुल्ककी हालत दिन-ब-दिन बिगड रही है। और हिंदू राज नहीं कर सकते यह जाहीर है। यह हिस्टरी है। राजमें मुसलमानोंका हिस्सा नहीं है यह इसकी वजह है। मुसलमानोंको आगे आ के मुल्कके लिये कारोबारमें अपना हिस्सा लेना चाहिये। वही मुल्कको तबाही से बचा सकते हैं। "

### डॉ. सय्यद महमुदांचे जे–तेच दावतचे

सय्यद महमूदना देशाची किती काळजी लागली आहे ते यावरून ध्यानात यावे! हा देश सुधारण्यासाठी मुसलमानांनी सत्तेतील आपला वाटा उचलला पाहिजे. मुसलमानेतरांना चांगले राज्य करता येत नाही, हा इतिहासाचा दाखला आहे, असे त्यांना वाटते! आता जमाते-इस्लामीचे ' दावत ' हे मुखपत्र १९६२ च्या चिनी आक्रमणानंतर काय म्हणते ते पाहा:
" सध्याचे लोक राज्य करायला नालायक आहेत हे या पराभवाने सिद्ध झाले आहे! ज्यांनी एक हजार वर्षे राज्य केले त्यांच्या हातांत सत्ता सुपूर्द करणे हाच देशापुढे एकमेव पर्याय आहे! "

### डॉ, सय्यद महमूद राष्ट्रीय कसे ?

सय्यद महमूद आणि जमाते इस्लामीचे लोक यांच्यात काही फरक आह काय ? नाही! आणि तरीही त्यांना राष्ट्रीय समजण्यात येते! राष्ट्रीयत्वाची आपली व्याख्या तरी काय आहे, हे एकदा आपण तपासून पाहू या. अल्पसंख्य जमातीने बहुसंख्याकांवर राज्य करण्याची आकांक्षा बाळगणे ही राष्ट्रीयत्वाची लक्षणे समजावयाची, की न्यायावर, आधुनिक जगातील मूलभूत नैतिक मानवी मूल्यांवर आधारलेल्या राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करणे हे राष्ट्रीयत्व ? या असल्या तथाकथित राष्ट्रीय मुसलमानांना 'राष्ट्रीय' म्हणणारांनी याचे उत्तर देणे आवश्यक आहे.

### पाकिस्तानविरोधाचे इंगित ओळखा

पाकिस्तानला या राष्ट्रीय मुसलमानांनी विरोध केला याबद्दल बराच गाजावाजा केला जातो. आपण त्यांची भूमिका समजावून घेण्यासाठी

राष्ट्रीय मुसलमान आणि लीगची भूमिका यांच्यात नेमके मतभेद कोणते होते हे पाहणे आवश्यक आहे. मुसलमानांना या देशाच्या शासनात एक विशिष्ट वेगळे आणि महत्त्वाचे स्थान असले पाहिजे ही लीगची भूमिका होती. जीना याच भूमिकेचा प्रारंभी पुरस्कार करत होते. थोडक्यात या देशाच्या राष्ट्रवादी प्रवाहात मुसलमानांचा एक वेगळा उपराष्ट्रवाद अस्तित्वात आहे; तसा तो असला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती! हा उपराष्ट्रवाद मुसलमानांना घटनेत खास आणि त्यांच्या लोकसंख्येहून अधिक प्रतिनिधित्व देऊन कायम ठेवण्यात यावा, असे जीनांचे म्हणणे होते. या उपराष्ट्रवादाला नेहरूंनी विरोध केला. त्यांनी खास प्रतिनिधित्व देण्याचे नाकारले. खरा झगडा– जीनांचा वेगळ्या मुस्लीम राष्ट्रवादाबरोबर भारतीय राष्ट्रवादाने करार करावा ही भूमिका, आणि अशी वेगवेगळ्या कुणाच्याच राष्ट्रवादाला मान्यता न देण्याची नेहरूंची भूमिका– यांच्यातील होता! हा प्रश्न राजकीय नव्हता, वेगळ्या राष्ट्रवादाच्या मुस्लिम धार्मिक प्रेरणांचे जीना प्रतिनिधित्व करत होते, आणि नेहरू हे वेगळ्या राष्ट्रवादाचे स्थानच नाकारत होते! संघर्ष येथे उडाला, आणि पाकिस्तान झाले! मुसलमानांचा झगडा किंवा जीनांचे भांडण सावरकरांशी अथवा गोळवलकरांबरोबर झालेले नाही. किंबहुना सावरकरांची भूमिका जीनांना मान्य असावी असे दिसते! आपल्या अहमदाबाद हिंदू-सभेच्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना सावरकरांनी "मुस्लिमांचे एक वेगळे राष्ट्रच जणू भारतात अस्तित्वात आहे" असे म्हटले आहे, हे या संदर्भात विचारात घेणे आवश्यक आहे! मुसलमानांच्या वेगळ्या राष्ट्रवादाचे अस्तित्व सावरकरांनी मान्य केले होते. त्यांना त्यांची संस्कृती, भाषा, लोकसंख्येच्या बाबतीतील प्रतिनिधित्व या साऱ्याबाबत लेखी अभिवचन देण्याचीही त्यांनी तयारी दर्शवली होती! हे सारे त्या भाषणातच आहे. मात्र या राष्ट्रवादाला वेगळे राष्ट्र स्थापण्याचा अधिकार ते नाकारत होते. या दृष्टीने नेहरूंची भूमिका ही सर्वांत अधिक निर्भेळ भारतीय राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी होती. खऱ्या अर्थाने सेक्युलर इंटिग्रेशन त्यांना अभिप्रेत होते. जीनांना सेक्युलर इंटिग्रेशन नको होते. प्रत्येकाचे वेगळे अधिकार अबाधित ठेवून अनेक राष्ट्रवादी प्रवाह

एका राष्ट्रात राहावेत असे ते मानीत होते. नेहरूंनी ही सवलत नाकारली तेव्हा जीनांनी वेगळे पाकिस्तान मागण्याचा निर्णय घेतला!— हा इतिहास कोणीही विसरून चालणार नाही.

### एक निरर्थक युक्तिवाद

या संदर्भात १९३७ साली उत्तर प्रदेशात काँग्रेसने मुस्लीम लीगला $\frac{1}{3}$ जागा मंत्रिमंडळात द्यायचे नाकारून फार मोठी चूक केली असे मानण्यात येते. असे मानणारे बहुधा हा केवळ राजकीय डाव आहे किंवा होता असे मानत असावेत असे दिसते. आपण या दोघांकडे केवळ राजकीय दृष्टि-कोणातून पाहू नये, असे मला सुचवावेसे वाटते. मुस्लीम नेत्यांच्या मागण्यां-मागील प्रेरणा वेगळ्या होत्या. त्या धार्मिक होत्या. हा केवळ एकदोन जागा कमीजास्त देण्या-घेण्याचा प्रश्न नव्हता. आपण दोघे राज्य करू या, असे तेव्हा जीना म्हणत होते! ही भूमिका मुसलमानांना सत्तेत ५० टक्के वाटेकरी करण्याची होती. हा प्रयत्न फसल्यानंतर "आम्हांला आमचे वेगळे राष्ट्र द्या" ही मागणी पुढे आली!

### ही तडजोड झाली असती तर असे विपरित झाले असते

१९३७ साली लीगच्या मागणीनुसार तडजोड झाली असती तर काय झाले असते? मुसलमानांचे एक वेगळे स्थान घटनेनेच मान्य केले असते. या स्थानाबद्दल सतत वाद होत राहिला असता. या स्थानाबद्दलचा मुस्लीम पुढाऱ्यांनी अगदी वेगळाच अर्थ लावला असता. प्रत्येक विधेयकाला, प्रत्येक गोष्टीला मुस्लीम नकाराधिकार–व्हेटो लागू झाला असता! देशाची सर्वच प्रकारे कुंचबणा झाली असती. राष्ट्राच्या सीमेतच या दोन राष्ट्रवादी प्रवृत्तींत संघर्ष निर्माण झाला असता. भयानक यादवी युद्ध माजले असते. आज जो संघर्ष भारत-पाकिस्तान संघर्षाच्या स्वरूपात झाला आहे त्याचेच स्वरूप राष्ट्रान्तर्गत यादवीत झाले असते!

### फाळणी करणे हाच एकमेव मार्ग होता

यादवी युद्धाच्या शक्यतेने भयाकुल होऊन मी अप्रत्यक्षपणे पाकिस्तानचे समर्थन करतो आहे असा कृपा करून समज करून घेऊ नका. सवाल

यादवी युद्धाचा नाही. अनेक देशांना आपले राष्ट्रीय ऐक्य टिकवून धरण्यासाठी यादवी युद्धाचा धोका पत्करावा लागला आहे. तो कधी पत्करावा लागतो. यादवीला प्रवृत्त झालेल्या फुटीर प्रवृत्ती कठोरपणे मोडून काढाव्या लागतात. सवाल असा आहे की, हे आव्हान आम्ही कसे स्वीकारले असते? हे यादवी युद्ध कठोरपणे मोडून काढले असते काय? 'नाही' असे याचे प्रामाणिक उत्तर आहे. अखंड हिंदुस्थानात खास स्थान मिळालेल्या मुस्लीम समाजाने भारताची इस्लामीकरणाची प्रक्रिया पुढे चालू करण्याचा निर्णय घेतला असता, आणि 'राष्ट्रीय मुसलमान' आणि लीगवाले तेव्हा बहुधा एकत्र आले असते!

### जमायत उल-उलेमा इ हिंदच्या राष्ट्रीयतेचे स्वरूप

राष्ट्रीय मुसलमान पुढाऱ्यांच्या काही वक्तव्यांतच त्यांच्या या डावपेचाची चाहूल लागते. मौ. हुसेन अहमद मदनी हे तेव्हाचे एक थोर राष्ट्रीय मुसलमान. जमायते–उलेमा इ हिंदचे अध्यक्ष. आपल्या १९४५ सालच्या उलेमांच्या दिल्ली अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात त्यांनी म्हटले आहे, "पाकिस्तान इस्लामी राष्ट्र होणार असेल तर त्याला आमचा बिलकूल विरोध नाही. परंतु पाकिस्तानच्या निर्मितीने भारताला इस्लाममय करण्याच्या उद्दिष्टात अडथळे निर्माण होतील. आमचे ते महान उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टाला साजेशी अशी येथील हिंदू लोकसंख्या आहे. हिंदू या दृष्टीने कच्चा माल आहेत!" रॉ मटेरियल असा शब्द त्यांच्या भाषणाच्या मी वाचलेल्या इंग्रजी भाषांतरात आहे!

### दारापेक्षा औरंगजेब त्यांना श्रेष्ठ वाटतो

हेच मौलानासाहेब आणखी एके ठिकाणी म्हणतात, "दारा विजयी झाला असता तर मुसलमान येथे राहिले असते, परंतु इस्लाम राहिला नसता! औरंगजेब विजयी झाल्यामुळे येथे मुसलमानही आणि इस्लामही राहिला!" मौलानासाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे दारा पाळीत असलेला धर्म हा खरा इस्लाम धर्म नव्हेच, कारण तो हिंदूंशी सहिष्णुतेने वागा म्हणत होता. शरीयतचे राज्य असले पाहिजे असे म्हणत नव्हता! धर्माचा परंपरा-

गत अर्थ तो लावत नव्हता. मौलानासाहेबांच्या वरील उद्गारांवरून राष्ट्रीय मुसलमानांपैकी अनेक कोणता इस्लाम मानत होते व त्यांची उद्दिष्टे काय होती हे स्पष्ट व्हायला हरकत नाही !

**जीनांचेच हे भाईबंद म्हटले तर गैर काय ?**

जीना आणि राष्ट्रीय मुसलमान यांच्यात फरक काय ? जीनांना वेगळे राष्ट्र हवे होते, राष्ट्रीय मुसलमानांना सबंध हिंदुस्थान हवा होता ! सबंध हिंदुस्थान मिळू शकणार नाही म्हणून जीनांनी वेगळे राष्ट्र मागितले ! हिंदूंशी जेहाद करून ते मागाहून मिळवता येईल असे बऱ्याच राष्ट्रीय मुसलमानांना वाटत होते ! म्हणून त्यांनी पाकिस्तानला विरोध करण्याचे धोरण अवलंबले ! हिंदु-महासभेचे एक नेते डॉ. मुंजे एकदा एके ठिकाणी म्हणाले आहेत, " हा जीना मूर्खच दिसतो. त्याला सबंध हिंदुस्थान गिळंकृत करता येईल. तो वेगळे राष्ट्र का मागतो आहे तेच कळत नाही ! " मुंजे ह्यांचे हे उद्गार बहुधा येथील मुस्लीम समाजाच्या धार्मिक प्रेरणांना उद्देशून असले पाहिजेत यात शंका नाही.

**मुस्लिम नेत्यांचा एक चाणाक्ष उद्योग**

फाळणीचे खापर हिंदू जातीयवादी प्रवृत्तींवर फोडण्याचा एक उद्योग मुसलमान पुढारी नेहमी करत असतात. आता या सबंध इतिहासात हिंदू जातीयवादी कुठे येतात ते मला कळत नाही ! संघर्ष नेहरू आणि जीना, गांधीजी आणि जीना यांच्यात उडालेला आहे ! सावरकर आणि गोळवलकर या चित्रात आपल्याला कुठे दिसतात का ? जीना हे सावरकर आणि गोळवलकर यांच्या विरुद्ध झगडत नव्हते. ते जातीयवादी असल्याचा दाखला देत नव्हते. गांधीजी आणि नेहरू आपल्या मागण्या मान्य करत नाहीत आणि म्हणून ते हिंदू जातीयवादी आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे ! आणि मुसलमान पुढारी फाळणीला हिंदू जातीयवाद्यांना जबाबदार धरतात तेव्हा त्यांना गांधीजी व नेहरू हे हिंदू जातीयवादी आहेत असे म्हणायचे असते ! याचा अर्थ स्पष्ट आहे. प्रत्येक हिंदू जातीयवादी असतो असे त्यांना म्हणावयाचे असते. प्रत्येक मुसलमान हा मात्र राष्ट्रवादी असतो, असाही ते एक अजब दावा मांडत असतात !

### खरा झगडा मुस्लीम जातीयवाद व सेक्युलॅरिझम यांतील

हा खरा हिंदू जातीयवादी आणि मुस्लीम जातीयवादी यांचा झगडा नव्हेच. नेहरू-गांधीजी यांच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या कल्पना आणि मुसलमानांच्या मुस्लीम राष्ट्रवादाच्या प्रेरणा यांच्यात उडालेला हा संघर्ष आहे ! गांधीजी आणि नेहरूंना सेक्युलर इंटिग्रेशनच्या मार्गाने देश एकत्र ठेवण्यात अपयश आले हे खरे, परंतु हे अपयश त्यांचे एकट्याचे नाही, आपणा सर्वांचे आहे. हे आव्हान स्वीकारण्याइतके सामर्थ्य हिंदू समाजाने कमावलेले नाही ही यामागील विदारक वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती गांधीजींनी, नेहरूंनी आणि वल्लभभाईंनी ओळखली, हिंदू जातीयवादी गांधी-नेहरूंना शिव्यांची लाखोली वाहतात त्यांनी ती ओळखलेली नाही; ही आणखी एक विदारक वस्तुस्थिती आहे !

### इस्लामचे धार्मिक स्वरूप समजून घेणे हितावह

भारतीय मुस्लीम जातीयवादाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी मुस्लीम धर्माचे स्वरूप आणि इतिहास यांचे परिशीलन होणे आवश्यक आहे. इस्लाम हा अखेरचा आणि परिपूर्ण धर्म म्हणून अस्तित्वात आला ही या धर्माच्या अनुयायांची श्रद्धा आहे ! महंमद पैगंबर, शेवटचे पैगंबर यानंतर नवा पैगंबर येणे नाही; नवा धर्म नाही. आणि आहे त्या धर्मात काही परिवर्तन होणार नाही, असे थोडक्यात या धर्माच्या अनुयायांना वाटते.

### इस्लामी समाजव्यवस्थेचाही आग्रह

सर्वसाधारण इतर धर्मांत जसे काही मूलभूत बरेवाईट सिद्धान्त मानण्यात येतात तेवढेच इस्लामचे हे सिद्धान्त मर्यादित नाहीत. इस्लाम परिपूर्ण व अपरिवर्तनीय आहे, असे जेव्हा मुसलमान मानतात तेव्हा त्यांची ती श्रद्धा धर्माच्या आध्यात्मिक स्वरूपापुरती मर्यादित नाही. इस्लामने केवळ एक आध्यात्मिक धर्मच दिलेला नाही, एक संपूर्ण समाजव्यवस्था दिली आहे, राजकीय व्यवस्था दिली आहे. इतर धर्मीयांशी कसे संबंध ठेवायचे

हेही धर्माने सांगितले आहे. साधारणतः सनातनी, परंपरागत मुसलमान इस्लामविषयी वर सांगितलेल्या सर्व गोष्टींवर निष्ठा ठेवतो. मौ. मौदुदी, मौ. अबुलहसन नदवी इत्यादींनी तर या सनातनी सिद्धान्तात आर्थिक सिद्धांताचीही भर घातली आहे ! आज मौ. मौदुदींना आणि नदवींना भारतातील मुसलमानांतील बहुसंख्य अनुयायी लाभलेले आहेत ही वस्तु-स्थिती आपल्याला डोळ्यांआड करता येणार नाही !

### मध्ययुगीन सिद्धान्ताभोवती घुटमळणारी मने

या मध्ययुगीन सिद्धान्ताभोवतालीच मुसलमानांची मने अद्याप घुटमळताना दिसत आहेत. प्रत्येकच धर्माच्या अनुयायांचे असे काही काळ होते. प्रत्येक धर्माचे असे परंपरागत सनातनी सिद्धान्त कवटाळून बसणारी माणसे असतात. परंतु हे सिद्धान्त झुगारून देणाऱ्यांचा प्रबळ वर्ग हिंदू आणि ख्रिश्चन समाजात निर्माण झाला याला काही कारणे घडली. त्यांच्या धर्मांवर काही आघात घडले. ख्रिश्चनांवर मुसलमानी आक्रमणांचे आघात घडले, तसे ते हिंदूंवरही घडले. या आघातांतून, त्या आघातांनी झालेल्या पराजयांतून या समाजांत सुधारणेचे प्रवाह निर्माण झाले. मुसलमान समाजाच्या दुर्दैवाने, मुस्लीम समाजाला अशा आघातांतून जाण्याचा प्रसंगच आलेला नाही.

### मुसलमानांच्या धर्मनिष्ठा धोक्यात न आल्याचे परिणाम

मी जेव्हा ख्रिश्चन आणि हिंदू समाजांवर आघात घडले असे म्हटले तेव्हा ते आघात केवळ राजकीय आक्रमणापुरते मर्यादित अर्थाने मला म्हणायचे नाहीत. तसे मर्यादित अर्थाने मुसलमानांवरही आघात झाले आहेत. परंतु त्यांचे स्वरूप वेगळे आहे. मुसलमान समाज इतरांचा अंकित झाला. परंतु त्याच्या धर्मनिष्ठा धोक्यात आल्या नाहीत. उलट जेव्हा जेव्हा ख्रिश्चनांचे आणि हिंदूंचे मुसलमानांनी पराभव केले तेव्हा तेव्हा त्यांना त्यांनी केवळ राजकीय दृष्ट्याच अंकित केले नाही, त्यांच्या धर्मश्रद्धेलाच हादरा दिला ! त्यांच्यावर धर्मही लादण्याचा प्रयत्न केला ! आपली धर्म-श्रद्धा अंकित राहिल्याने अबाधित राहूच शकत नाही ही जाणीव त्या

धर्मांच्या अनुयायांत निर्माण झाली; आणि म्हणून धर्माचा नव्याने विचार करण्याचा विचार त्या समाजातून निर्माण झाला.

### इतिहासच याला जबाबदार

मुसलमान समाज अंकित झाले, भारतात मुसलमानांचे हिंदूंनी पराभव केले. परंतु त्यांचे बलाने धर्मांतर केले नाही. शिवाजीनेही असे केले नाही. काही ख्रिश्चनांनी जेव्हा हे पराभव केले तेव्हा त्या समाजाने बळाने धर्मांतर करण्याच्या कल्पनेचा त्याग केला होता आणि आधुनिकतेच्या उंबरठ्यावर ख्रिश्चन समाज येऊन उभा राहिला होता. जेव्हा ख्रिश्चन या आधुनिक काळात आले नव्हते तेव्हा त्यांनीही मुसलमानांना बळाने ख्रिश्चन केलेच! स्पेन हे त्याचे उदाहरण, परंतु हा एकच अपवाद आहे! जेव्हा तुर्की साम्राज्याचे विघटन सुरू झाले आणि पाश्चात्य राष्ट्रांनी त्याचे लचके तोडावयास सुरुवात केली तेव्हा ही राष्ट्रे मुसलमानी प्रदेशात वसाहतवादी, साम्राज्यवादी म्हणून आली, धर्मविस्तारवादी म्हणून आली नाहीत. थोडक्यात, तुर्की कॉन्स्टॅंटिनोपल घेतात तेव्हा त्याचे इस्तंबूल होते, तेथील चर्च फोडले जाऊन त्याच्यावर मशीद बांधली जाते, बायझेन्टाइन साम्राज्यातील ख्रिश्चन नागरिकांना इस्लामची दीक्षा दिली जाते. पण मोगल सेना भारतात नवा प्रदेश जिंकते तेव्हा जिंकलेल्या खेड्यांतील देऊळ प्रथम फोडून टाकते! काही नागरिकांना मुसलमान करते. औरंगजेब काशी-विश्वेश्वराच्या मंदिराचा विध्वंस करतो, आणि श्रीकृष्णाच्या जन्मस्थळी मथुरेत मशीद बांधतो! आणि पाश्चात्य राष्ट्रांच्या ताब्यात गेलेल्या मक्का-मदिनेत काही परिवर्तन होत नाही! जेरूसलेमची उमरची मशीद अबाधित राहते. मुस्लीम श्रद्धा अभंग राहतात. तसे स्वातंत्र्य त्या पारतंत्र्यातही मिळते. भारतात शिवाजीसारखा मोगलांना हटवणारा राजा पिरांना, दर्ग्यांना अनुदाने देताना दिसतो. इतिहासाचा हा प्रवाह अशी चमत्कारिक वळणे घेत गेला आहे की त्याने मुस्लीम मनाला मध्ययुगीन अवस्थेतून आधुनिक युगात आणण्यासाठी धक्का देण्याचे कार्यच केले नाही! दोष द्यायचा तर तो इतिहासाला द्यावा लागेल; मुसलमानांना देण्यात अर्थ नाही.

परंतु यामुळे काय झाले आहे ते पाहा! मुसलमानी राज्ये नष्ट होतात, समाज परतंत्र होतो, परंतु तो नष्ट होत नाही. आणि समाज शिल्लक राहिल्यास तो आपल्या पारतंत्र्याचे जोखड झुगारू शकतो. पुन्हा तो राज्य प्रस्थापित करतो. आता येथे मुस्लिमांच्या स्वातंत्र्याच्या आणि पारतंत्र्याच्या व्याख्या आधुनिक राष्ट्रवादाच्या संदर्भात ठरत नाहीत हे ओघानेच आले. ( येथे या चळवळींचे कम्युनिस्ट चळवळीशी असलेले साम्य आणि फरकही महत्त्वाचा आहे. स्वतंत्र असणे म्हणजे मुस्लीम समाजाच्या हाती सत्ता असणे! या दृष्टीने पाकिस्तानी मुसलमान स्वतंत्र झाले, भारतीय मुसलमान परतंत्र आहेत! भारतीय मुस्लीम असे मानतात की, भारतातील मुसलमान हे मक्केतील मुसलमान आहेत, पाकिस्तानातील मुसलमान मदिनेतील मुसलमान आहेत! या उद्गारांचा अर्थ असा की, महंमदाने मक्का सर करण्यापूर्वी मक्केतील मुसलमानांना कुरेश लोकांच्या छळाला तोंड द्यावे लागले. मदिनेत मुसलमानांचेच राज्य होते. महंमदाने मक्का काबीज केल्यानंतर हा छळ संपला! "आपण मक्केतील मुसलमान आहोत" हे मत भारतातील ग्रामीण मुस्लीम लोकसंख्येपैकी ७५ टक्के लोक तरी बाळगीत असले पाहिजेत असे मला वाटते!

### अयुबखानाबद्दल विकृत प्रेम

गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत एका मुसलमान मित्राबरोबर मी त्याच्या निवडणूक प्रचाराला एका ठिकाणी गेलो होतो. तेथे एक गृहस्थ भेटले. ते म्हणाले, " निवडणुकांचा कसला प्रचार करताहात? निवडणुका कशाला घ्यायच्या? अयूबखान येऊन सगळाच खेळ खतम करून टाकणार आहे!" या गृहस्थावर मी चिडलो नाही हे मला सांगितले पाहिजे. तो निरक्षर होता, तथापि मध्ययुगीन अवस्थेतील हे मुस्लीम मन अजूनही कोणत्या वेड्या आशा बाळगून आहेत हे पाहून मन अतिशय उद्विग्न झाले!

### मध्ययुगीन दुरवस्थेचे हे प्रतीक

भारतीय मुसलमान हे या मध्ययुगीन अवस्थेचे खरे प्रतीक आहे. पाकिस्तानात आधुनिकतेची एक प्रक्रिया कुठे तरी सुरू झाली आहे.

परंतु ' आपण अल्पसंख्याक आहोत ' या तीव्र जाणिवेपोटी साऱ्या सुधारणेच्या प्रक्रिया भारतात रोखण्यात हा समाज यशस्वी ठरला आहे! आणि त्याला मध्ययुगीन अवस्थेत ठेवण्याबाबतीत आपल्या देशातील सर्वच सेक्युलर पक्षांचे एकमत आहे असे दिसते! काँग्रेसने तर या समाजाबाबतच्या, कोणत्याही सुधारणांना विरोध दर्शविला आहे! याची कारणे काँग्रेसच्या मुस्लीम नेतृत्वात आढळतील. हे नेतृत्व उलेमांचे आहे; सनातनी आहे; परंपरावादी आहे! त्यांचा अजूनही काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वावर प्रभाव आहे. मध्ययुगीन अवस्थेत वावरणाऱ्या मुस्लीम नेत्यांचा सल्ला मानणारे आपले राजकीय आणि शासकीय नेतृत्व मुसलमानांबाबतीत वेगळे धोरण अवलंबू शकत नाही यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही! आपल्या देशातील इस्लाम हा सगळ्यांत अधिक रूढ फॉर्ममध्ये अस्तित्वात आहे. म्हणून येथे पॅन-इस्लामिक चळवळी अस्तित्वात आहेत! पैगंबरांवर काही लिहिले गेले की जगात कुठे नाही त्या चळवळी आणि आंदोलने म्हणूनच येथे होत असतात! खिलाफत कमिटी अजूनही आपल्याच देशात अस्तित्वात आहे! अरबांना पाठिंबा देण्याचा मुस्लीम मनाचा पॅन-इस्लामिक उद्रेक आपल्याच देशात होत असतो! पाकिस्तान-इराण-तुर्कस्तान आणि सौदी-अरेबिया यांच्यांतील इस्लामी कराराचे आपल्याच देशातील मुसलमानांकडून जोरदार समर्थन होत असते!- या कराराचा रोख भारत विरोधी आहे ही वस्तुस्थिती माहीत असूनही! ' अरबांना पाठिंबा देऊ नका ' असे म्हणणारे भारतीय नेते देशद्रोही आहेत असे म्हणूनच जमायते-उलेमाचे चिटणीस मौ. असद मदनी म्हणतात! कारण भारतप्रेम म्हणजे मुस्लीमप्रेम अशी त्यांची भारतप्रेमाची सोपी व सुटसुटीत व्याख्या आहे! म्हणूनच अरबांकरता लाखो रुपये फंड गोळा केला जातो. पाकिस्तानविरुद्धच्या लढाईत मृत्यू पावलेल्या वीरांकरता, अगदी अ. हमीद हाशमसारख्या परमवीरचक्रविजेत्या मुस्लीम वीराच्या कुटुंबियांचेसुद्धा सर्व मुस्लीम संघटनांकडून दुर्लक्ष केले जाते! आणि आम्ही

ही जी इस्लामची व्याख्या करीत आहोत त्या व्याख्येनुसार आम्हांला वागण्याचे स्वातंत्र्य या देशातील बहुसंख्य हिंदू देत नाहीत, हा आमच्यावर हिंदूंचा अन्याय चाललेला आहे, असे मुस्लिम नेते म्हणत असतात! थोडक्यात, या देशात हिंदू बहुसंख्य आहेत — हा मुसलमानांवर अन्याय आहे, असे या नेत्यांचे म्हणणे आहे, हे या विवेचनावरून स्पष्ट होईल.

▣ ▣

# ४ मानवतावादी आधुनिकता हाच इलाज

भारतातील मुस्लिम प्रश्नाचे स्वरूप मी मागील लेखांकात मांडले आहे. या संदर्भात हिंदू जातीयवादाचा विचार करायला हवा. पण माझे मत असे आहे की हिंदू जातीयवाद हा मूलतः मुस्लिम जातीयवादाला प्रति-उत्तर देण्याच्या स्वरूपात आपल्या देशात निर्माण झाला आहे. हिंदू जातीयवाद असण्याची कारणे नष्ट करा— थोडक्यात मुस्लिम जातीयवाद नष्ट करा— आपल्याला या देशात मूठभरदेखील प्रभावी हिंदू जातीयवादी आढळणार नाहीत.

## दोन जातीयवादातील मूलभूत फरक

या दोन जातीयवादांना समान न लेखण्याचे एवढेच एक कारण नाही. मी आधीच स्पष्ट केल्याप्रमाणे हिंदू समाजात आधुनिक मूलभूत मानवी मूल्यांचे महत्त्व ओळखणारा एक हिंदू उदारमतवादी वर्ग निर्माण झाला आहे, आणि तो हिंदू जातीयवाद्यांशी सतत झगडतो आहे. ही जी विभागणी हिंदूत झालेली आहे तशी ती मुस्लिम समाजात नाही हे एक मी त्या दोन जातीयवादी प्रवृत्तींना समान न लेखण्याचे कारण आहे. मुस्लिम जातीयवादाचे मूलभूत स्वरूप आक्रमक, विस्तारवादी आहे. हिंदू जातीयवाद प्रतिक्रियावादी, बचावात्मक भूमिका धारण करणारा आहे. त्याला कितीही आक्रमक स्वरूप आणण्याचा प्रयत्न केला गेला तरी

तो काही मर्यादेच्या पलीकडे आक्रमक स्वरूप धारण करू शकणार नाही. हिंदू समाजाचा विस्कळितपणा, संघटित असलेल्या उदारमतवादी हिंदू वर्गांची अशा आक्रमकतेला रोखण्याची सतत चाललेली धडपड ही त्याची कारणे आहेत. अगदी फाळणीनंतरच्या तीव्र प्रतिक्रियेच्या काळातही हिंदू जातीयवादी राष्ट्रीय प्रवृत्तींवर मात करू शकले नाहीत त्याची ही काही कारणे आहेत.

### हिंदूंची अनेक रूपे

हिंदूंची अनेक रूपे आहेत, असे मी आरंभीच म्हटले. मुस्लिम मनाचे स्वरूप समजावून घेण्यासाठीदेखील या विविध रूप धारण करणाऱ्या हिंदू मनाचे स्वरूप आपण समजावून घेतले पाहिजे. हिंदू समाजात मत-स्वातंत्र्य ( फ्री एक्स्प्रेशन ) आहे. याचा एक परिणाम म्हणजे नवा किंवा वेगळा विचार या समाजात सतत येत राहिला आहे. याचा एक परिणाम असा होतो की, अतिरिक्त चुकीचे देखील विचार हिंदू मांडू शकतो. त्याचा प्रचार करू शकतो. एवढ्यावरच हे थांबत नाही. अशा चुकीच्या विचार मांडणाऱ्यांच्या मागेही चार हिंदू जातात! त्यामुळे हिंदूंत एकाच वेळी अति सहिष्णू मानवतेची आणि अति संकुचित क्रूर भूमिका घेत असलेल्या व्यक्ती आढळतील. हिंदूंचे हे असे अनेक मुखवटे आहेत! एक प्रकारे तो मल्टि-हेडेड हायड्राच ( बहुमुखी सर्प ) आहे. कधी कधी तो फार घोटाळे करून बसतो. आपल्याला सोयीस्कर असेल असा चेहरा पुढे आणतो. त्यामुळे वेळ निभावून जाते. कुठल्याही प्रश्नाचा निर्णय लागू शकत नाही. प्रश्न अनिर्णित ठेवता येतात. स्पष्ट बोलण्याचे टाळता येते. स्वतंत्र विचार मांडत असल्याचे श्रेय घेता येते. टाळ्या आणि अनुयायीही मिळवता येतात. हे हिंदू मनाचे द्वंद्व चालूच आहे!

### हिंदू जातीयवाद्यांना न उमगलेले एक सत्य

याला अर्थात एक दुसरीही बाजू आहे. मुस्लिम राजकारणाचे स्वरूप आणि हिंदू मुस्लिम समस्या यांचा जो आपण विचार करत आहोत त्या संदर्भात या दुसऱ्या बाजूलाही तितकेच महत्त्व आहे. मी मघाशी म्हटले

की, मुसलमानांचे हे आव्हान हिंदू समाजाने स्वीकारलेले नाही असे गांधीजी आणि नेहरू यांनी ओळखले होते; हिंदू जातीयवाद्यांनी ओळखले नाही! मला हे म्हणताना नम्रपणे असे सांगायचे आहे की, राष्ट्रीय आव्हाने स्वीकारावयास आवश्यक असलेली चैतन्यशीलता हिंदू समाजाने पुन्हा कमावलेली नाही, हे गांधी-नेहरूंनी ओळखले होते; हिंदुत्ववाद्यांनी ते अद्यापही ओळखलेले नाही. हे चैतन्य हिंदू समाजाने गमावल्याला हजार वर्षे झाली. ज्या गतिहीनतेच्या दलदलीत हिंदू समाज अडकला होता, त्यातून त्याची संपूर्ण सुटका करून घेणे, त्याला अजून जमलेले नाही. मी देशातील सध्या माजलेल्या वादांबद्दल बोलत नाही, वाद प्रत्येक देशात आहेत, याहून अधिक तीव्र आहेत. या वादांवर मात करण्याइतकी गतिमानता आम्ही प्राप्त करू शकलो आहोत का, हा खरा प्रश्न आहे. ही चैतन्यशीलता अमेरिकन समाजात आहे; ही चैतन्यशीलता रशियन समाजात आहे; ही चैतन्यशीलता हळूहळू युरोप (रशिया आणि अमेरिकेच्या तुलनेने) गमावतो आहे, म्हणून तो मागे पडत आहे. हे लक्षात ठेवा की, नेहमी चैतन्यशील राष्ट्रांच्या सीमा विस्तार पावत असतात. या सीमा कधी प्रत्यक्ष भौगोलिक सीमा असतील, कधी त्या सांस्कृतिक आणि आर्थिक- राजकीय प्रभावाच्या असतील. आपल्या देशाच्या सीमा मागे हटल्या आहेत. आणि हे या देशातील बहुसंख्य समाजाच्या पुरेशा चैतन्यशीलतेच्या अभावाचे लक्षण आहे! सीमा हटायला नेतृत्व कारणीभूत नाही- दुबळे नेतृत्व फेकून देण्याचे सामर्थ्य चैतन्यशील समाज बाळगत असतो, हे चेंबरलेनला फेकून इंग्लिश समाजाने इतिहासात सिद्ध केले आहे! आम्ही नेतृत्वाला कठीण प्रसंगी बाजूला फेकू शकलो नाही, हा आमचा दोष आहे. नेतृत्व या अपुऱ्या चैतन्यशीलतेचे प्रतीक होते!

### अरब-इस्राएल संघर्षातील एक अर्थ

मग मुस्लिम समाज चैतन्यशील आहे काय? अजिबात नाही! अरबांच्या सीमा चोवीस तासांत किती मागे हटल्या हे आपल्या लक्षात असेलच. आज जगात कुठेही इस्लामी संस्कृतीचा प्रभाव आढळून येत नाही. चैतन्य गमावलेल्या समाजाचीच ही लक्षणे आहेत. इस्लामिक डायनॅमिझम

किंवा चैतन्यशीलता ही केवळ धर्मविस्तार करण्यातच मशगूल राहिलेली आहे. त्याला चैतन्यशीलता असे मुसलमान म्हणतात, वस्तुतः ती जंगली मध्ययुगीनता आहे! पण जंगली मध्ययुगीनतेला मुसलमान चैतन्यशीलता म्हणतात, यातच त्यांच्या विनाशाची बीजे दडलेली आहेत.

## चैतन्य नव्हे– तिसऱ्या शक्तीची कृपा

मग येथे मुसलमानांपुढे हिंदू हतबल झाल्याचे दृश्य कसे दिसते? पाकिस्तानची निर्मिती ही या मुस्लिम चैतन्यशीलतेची लक्षणे नव्हेत, तिसऱ्या पक्षाच्या सहाय्याने केलेली ती अडवणूक होती. ती संपली. तथापि खरा संघर्ष दोन मनांमागील प्रवृत्तींचा आहे. मुस्लिम मन हे स्वभावतः विस्तारवादी आहे, कारण ते धर्मविस्तारवादी आहे. हिंदू हा बंधनवादी आहे. सीमा ओलांडायच्या नाहीत, हा त्याने स्वतःवर घालून घेतलेला एक नियम! आता स्वतःवरच बंधने घालून घ्यायची त्याची सवय कशी वेगळ्या प्रकाराने प्रगट होते पाहा. तो आपल्याच देशातील काश्मीर या भागात आपण जायचे नाही असा नियम करून टाकतो! तो नागा प्रदेशात कुणी जायचे नाही, असे स्वतःवरच बंधन घालतो! हिंदू मनाच्या गंजलेल्या अवस्थेची ही लक्षणे आहेत. झारिस्ट रशियाचा विस्तार एके काळी दिवसाला ५० चौरस मैल अशा रीतीने सतत १०० वर्षे होत गेला असे मी नुकतेच वाचले! माफ करा, मी जेव्हा विस्तारवादाबद्दल बोलतो तेव्हा मला एखाद्या समाजाने विस्तारवादी बनावे, असे अजिबात सुचवायचे नाही. अखेरीस विस्तार किती व कसला करायचा याची नैतिक सीमा संभाळणारे मन आधुनिकतेने तयार होते. तेही या चैतन्यशील हिंदू समाजाने धारण करावे अशी माझी अपेक्षा आहे. तेव्हा हिंदू पुरेसा चैतन्यशील होण्यावर हिंदू–मुस्लिम संबंधांचे स्वरूप अवलंबून आहे. तो तसा झाल्यास मुस्लिमांना जे धक्के इतिहासाच्या ओघात बसले नाहीत, ते बसले जातील. मग त्या समाजासमोर एक तर नामशेष होणे किंवा बदलणे, हे दोनच पर्याय शिल्लक उरतील; आणि नामशेष होण्यापेक्षा बदलणेच कोणताही समाज पसंत करतो.

ही चैतन्यशीलता येणे आणि मनाचा समतोलपणा साध्य होणे हे मुस्लिम राजकारणाचे आव्हान स्वीकारण्याचे खरे दोन उपाय आहेत. हिंदू सनातनीपणा कमी कमी होत जाणे, जाती नष्ट होणे, सामाजिक समतेच्या आणि मानवतेच्या मूलभूत कसोटीवर आधारलेल्या समाजाकडे चालू असलेली हिंदूंची वाटचाल अधिक जोराची होणे, हिंदू खऱ्या अर्थाने आधुनिकतेचा स्वीकार करीत असलेला दिसणे हे उपाय आहेत. दुर्दैव असे आहे की, हा मनाचा समतोल हिंदू मनाने बाळगलेला नाही. ज्यांनी आधुनिकतेचा, खऱ्या न्यायाचा आणि बंधुभावाच्या शिकवणुकीचा स्वीकार केला आहे त्यातील काही, मुस्लिम जातीयवादाचा पाठपुरावा करतात, काही त्या जातीयवादाविरुद्ध बोलायचे टाळतात आणि काही अप्रत्यक्षपणे त्या जातीयवादाला खतपाणी घालावयाचे कार्य करतात! या जातीयवादाशी ज्यांना मुकाबला करायचा आहे, ते हिंदू, सनातनपणाचा, चातुर्वर्ण्याचा, गाईचे स्तोम माजवण्याचा, आणि हिंदूंना पुन्हा मध्ययुगीन काळात नेण्याचा आणि त्याला पर्यायाने चैतन्यहीन बनवण्याच्या क्रियेचा पाठपुरावा करीत असताना दिसत आहेत! हिंदू हिंदूंना आधुनिक बनवतो आहे, आणि त्याचबरोबर मुस्लिम इररॅशनल जातीयवादी राजकारणाला विरोध करतो आहे असे दृश्य दिसेल काय? तसे दिसावे ही माझी इच्छा आहे. कारण तसे ते दिसेल तेव्हा हिंदू–मुस्लिम प्रश्न संपुष्टात आला आहे हे आपल्या लक्षात येईल. कारण मुस्लिम जातीयवाद हिंदूंच्या या चमत्कारिक विभागणीचा फायदा घेतो आहे. ते दोन्ही पक्षांचा पाठिंबा मिळवतात! उर्दू उत्तर प्रदेश व बिहारमध्ये दुय्यम राज्यभाषा व्हावी, या मुस्लिम जातीयवादी मागणीला तथाकथित सेक्युलर हिंदू तथाकथित सेक्युलॅरिझमच्या नावाखाली पाठिंबा देतो! सेक्युलर हिंदूंचा सेक्युलॅरिझम म्हणजे मुसलमानांना सेक्युलॅरिझमच्या विरुद्ध वागायला पाठिंबा देणे हा आहे! समान कायदा मुसलमानांना लागू नये अशी तो भूमिका घेईल! तो शेख अब्दुल्लांना पाठिंबा देईल. पाकिस्तानशी काश्मीरची किंमत देऊन तडजोड केली पाहिजे असे म्हणेल! जमाते इस्लामीच्या लोकांना नासेर यांच्याविरुद्ध दिल्लीला निदर्शने करताना अटक

झाल्याबद्दल तो सरकारचा निषेध करील! पैगंबराबद्दलच्या भवन्सच्या पुस्तकांविरुद्ध मुसलमानांच्या निदर्शनांना पाठिंबा देईल! हमीद दलवाईंच्या 'इंधन' कादंबरीच्या निमित्ताने त्याला नामशेष करण्याचा पवित्रा टाक-लेल्या मुस्लिम धर्मवेड्यांच्या मागे तो उभा राहील आणि हमीद दलवाईला विरोध करील! न्या. छगला अलीगड प्रकरणी मुस्लिम राजकारणाला वळण लावण्याचा प्रयत्न करीत असताना कॉंग्रेसला विरोध करण्याच्या निमित्ताने छगला यांची फजिती होत असलेली लांबून बघत राहील! असा हा सेक्युलर हिंदू आहे!! उरला दुसरा सनातनी हिंदू. हा बनारस विद्यापीठातील हिंदू नाव काढण्याविरुद्ध आंदोलन सुरू करील, आणि त्याला मुस्लिम लीगचा पाठिंबा मिळवील! तो गोहत्या बंदीसारखे आधुनिकतेच्या प्रवाहाविरुद्ध जाणारे आंदोलन सुरू करील आणि मुस्लिम जातीयवादी त्यालाही पाठिंबा देतील! कारण मग त्यांना छगलांविरुद्ध संयुक्त फळी उभारता येईल, पैगंबराच्या केसाचे प्रदर्शन करण्याच्या निमित्ताने देशभर हैदोस घालता येईल, पैगंबराविरुद्ध काही बोलता कामा नये, अशी इतरांना दमदाटी देता येईल, आणि त्यापुढे इतरांना मान तुकवावी लागेल! थोडक्यात, हिंदूतील सनातनीपणाचा तो असा सतत गैरफायदा घेत राहील. लक्षात ठेवा, एका धर्मातील सनातनीपणाच्या आधारेच दुसऱ्या धर्मातील सनातनीपणा टिकत असतो! तुम्ही हिंदू सनातनीपणा नष्ट करायला लागा आणि त्यायोगे मुस्लिम सनातनीपणावर आघात करा!

### मुस्लिम जातीयवादाशी खराखुरा कोण लढतो?

मग मुस्लिम जातीयवादाविरुद्ध खरा कोण लढतो आहे? चारदोन पुरोगामी मुस्लिम! खऱ्या दृष्टीने पुरोगामी छगला हे या पुरोगामी मुस्लिम प्रवाहाचे धुरीण. त्यांची अवस्था काय आहे हे आता सर्वांनाच माहीत आहे. त्यांना मुस्लिमांचा विरोध आहे, आणि हिंदूंचा पाठिंबा नाही! अशी ही अवस्था आहे. आणि म्हणूनच या प्रश्नाची चर्चा करण्याची अशी पाळी अद्याप येते.

मी आपल्यासमोर उभे केलेले मुस्लिम समाजाच्या मनोवृत्तीचे चित्र भयानक आहे यात शंका नाही. परंतु ते आहे हे असे आहे. ते तसे

नाही असे समजून आपण आपली आत्मवंचना करून घेण्याने काही साधणार नाही असे मला वाटते.

## तळात एक वेगळी उसळी आहे

मात्र हे चित्र वरवरचे आहे. वर पृष्ठभागावर मुस्लिम समाज हा असा मध्ययुगीन अवस्थेत आहे; परंतु पृष्ठभागाखाली, खोल कुठे तरी या समाजात नकळत, मंद, ज्याला नाट्यमय स्वरूप नाही असा अदृश्य का होईना फेरबदल होतो आहे. ही प्रक्रिया तशी फार आधी सुरू झाली. तिचे काही टप्पे आहेत. समाज असाच टप्प्यांनी विकसित होत असतो.

## पुरोगामीपणाच्या वाटचालीचे टप्पे

सर सय्यद अहमदखान हा पुरोगामीपणाचा पहिला टप्पा. त्यांना मुसलमानांची आधुनिकता अभिप्रेत होती. परंतु ते हिंदूविरोधीच होते! जीना आणि इक्बाल हा दुसरा टप्पा. आरंभी ते हिंदूविरोधी नव्हते, पण इस्लामवादी होते. पुढे या इस्लामवादातूनच हिंदूविरोध आला! मुसलमानांच्या आधुनिकतेची वाढ येथपर्यंत येऊन थांबली तेव्हा हिंदू ही अवस्था ओलांडून किती तरी पुढे गेले होते. राजा राममोहन रॉय हा पहिला टप्पा. हे सर सय्यद अहमदचीच भाषा बोलत होते! ब्रिटिश राजवट ही देवाने दिलेली देणगी आहे, ही ती भाषा! सावरकर हा दुसरा टप्पा आहे. हिंदूंनी आधुनिक व्हावे, परंतु ही आधुनिकता तंत्रविषयक दृष्टिकोणाच्या मर्यादेत होती. टेक्नॉलॉजिकल आधुनिकता त्यांना अभिप्रेत होती. नेहरू हा तिसरा टप्पा. नेहरूंची आधुनिकता ही मूलभूत मानवी मूल्यांना मानत होती. हिंदूंतील हे दोन टप्पे एकाच कालखंडात घडलेले आहेत ! त्यांची एकमेकांत सरमिसळ झालेली आहे. मुसलमानांत ती आधुनिकता अद्याप आलीच नाही.

## मानवतावादी आधुनिकतेचा उदय

मुसलमानांच्या एका नव्या पिढीत आता कुठे ही मानवतावादी आधुनिकता डोकावू लागली आहे. या आधुनिक, मानवी मूल्यांचा स्वीकार

केलेल्या पिढीची तुरळक बेटे मध्ययुगीन मनोवृत्तीच्या मुस्लिम समाजाच्या महासागरात उगवलेली आता कुठे दिसत आहेत! ही आधुनिकता त्यांच्या लिखाणात आहे, बोलण्यात जाणवत आहे; कृतीत प्रकटते आहे. मी उदाहरणे देतो. महंमद यासीन, रशिदुद्दीन, अलीगड विद्यापीठात भेटलेले विद्यार्थी- विद्यार्थिनी, दिल्लीच्या निवडणुकीतील प्रकार, प्रा. हबीब, संतती नियमनाचा जिद्दीने पुरस्कार करणारे महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री डॉ. झकेरिया......

**नव्या प्रवाहांचे स्वागत हवे**

या नव्या प्रवाहाचे आपण स्वागत करणार काय? तो वाढवणार काय? हा खरा आपल्यापुढील प्रश्न आहे. पाकिस्तानच्या विस्तारवादाला पायबंद घालून आमच्या सीमा आहेत तेथेच राहिल्या पाहिजेत. पाकबाबत एक दीर्घकालीन धोरण आखले पाहिजे. येथील प्रगत मुस्लिम प्रवाहाला पाठिंबा दिला पाहिजे. हा पाठिंबा समान नागरी कायदारूपाने मिळाला पाहिजे. सर्व लग्ने रजिस्टर झाली पाहिजेत. धर्मांतर होता कामा नये. २१ वर्षांच्या नंतरच न्यायाधिशाच्या समोर फार तर ते व्हावे. आंतरधर्मीय विवाहितांच्या मुलांना वयात आल्यानंतर, हवा तर, त्यांना जो हवा असेल तो धर्म लावण्याची मुभा द्यावी, आधी नाही. रस्ते रुंद करताना, नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्यांचा संबंध असेल तेथे, सर्वांना सारखा न्याय लावावा. दर्गे आणि मारुती दोन्ही हटवले पाहिजेत. देशाच्या नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेतला जावा. सर्व धार्मिक मालमत्तेवर, वक्फ, देवळे, चर्चेस यांच्या उत्पन्नावर सरकारचे नियंत्रण असावे. हा पैसा समाजकल्याणासाठीच खर्च करण्यात यावा. धर्माचा आणि जातींचा उल्लेख करण्याचे बंधन नसावे. (शाळेत अजूनही धर्म कोणता, हा प्रवेशपत्रिकेत एक प्रश्न सापडतो!) अलीगड, बनारस ही विद्यापीठे राष्ट्रीय विद्यापीठे म्हणून मानली जावीत आणि त्यांच्या स्वरूपात आवश्यक तो फेरबदल करावा. काश्मीरचा खास दर्जा नष्ट करावा. नागा प्रदेशात जायला कुणालाही अडथळा असू नये. उर्दूच्या विकासाला संपूर्ण संधी मिळावी; उर्दू माध्यमाच्या शाळांना देखील संरक्षण असावे. मात्र उर्दूला दुय्यम भाषेचा दर्जा देण्याची मागणी कठोरपणे

मोडून काढण्यात यावी. देशातील सर्व स्त्रियांना कालमानानुसार एकच समान सामाजिक कायदे लावण्यात यावेत. गोत्रा–पद्धती कायद्याने बंद करावी. गोहत्याबंदीचा प्रश्न देशांच्या शेती आणि आर्थिक विकासाच्या संदर्भात सोडवला जावा. कुटुंबनियोजन सर्वांना सक्तीचे व्हावे. ज्या मुसलमानांना हे नको असेल त्यांना दुय्यम नागरिकत्व देण्यात यावे. त्यांचा मतदानाचा अधिकार काढून टाकावा. त्यांना समाजकल्याणाच्या कोणत्याही योजनांचा फायदा देण्याचे बंद करावे. ज्यांना शरियत हवी आहे त्यांना संपूर्ण शरियत कायदा लावावा, म्हणजे अशा मुसलमानांनी चोरी केल्यास त्यांचा भररस्त्यात हात कापला जावा ! खोटे बोलल्यास फटके मारावेत ! व्यभिचार करणाऱ्या मुस्लिम स्त्रीला रस्त्यात दगडांनी ठेचून मारावे ! वगैरे !...

### सेक्युलर इंटिग्रेशन ही प्रश्नाची सोडवणूक

थोडक्यात, या देशाचे झपाट्याने सेक्युलर इंटिग्रेशन करण्याचे कार्य सुरू करू या. तोच हा प्रश्न मिटवण्याचा प्रभावी मार्ग आहे. असा विचार होऊ लागल्यास मुस्लिम आधुनिक नव्या विचाराचा प्रवाह अधिक बळकट होईल. कारण आता त्याला परिस्थिती अनुकूल आहे. आता मुस्लिमांच्या हाती सत्ता नाही. सत्तेविना मुस्लिम सनातनीपणा हा दात काढलेल्या सापासारखा असतो ! त्याचे शेपूट तेवढे वळवळत राहील. त्या वळवळत्या शेपटाचा आपण फारसा विचार करू नये. आता यापुढे चर्चा करायची ती हिंदू–मुस्लिम प्रश्नाची नको. समान नागरी कायद्यावर चर्चा व्हावी, नव्हे त्यासाठी आंदोलन उभारावे. मुस्लिम स्त्रीला हक्क मिळावेत, ही मागणी करावी.

### हे विपरित जातीयवादाचे समर्थन थांबले पाहिजे

हे घडून येण्यासाठी सध्याची हिंदूमधील मतविभागणी नष्ट झाली पाहिजे. दुर्दैवाने ज्या हिंदूंना मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार करावयाचा आहे ते हिंदूंना सनातनी बनवण्याचा प्रयत्न करीत आहेत, आणि ज्या

हिंदूना हिंदू समाजाला आणि पर्यायाने देशाला आधुनिकतेच्या रस्त्याने न्यावयाचे आहे ते मुस्लिम जातीयवाद्यांना मिठ्या मारीत आहेत ! हे दृश्य बदलले पाहिजे. मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार करणाऱ्या हिंदूंच्या मी बाजूचा आहे आणि हिंदूंना सनातनी बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा विरोधक आहे. त्याचबरोबर हिंदूंना आधुनिक बनवणारांना माझा पाठिंबा आहे, परंतु मुस्लिम जातीयवादाचा प्रतिकार न करण्याच्या त्यांच्या धोरणाचा मी विरोधक आहे. हिंदूंत हा समतोलपणा आला तर आजचे तंग वातावरण निवळल्याखेरीज राहणार नाही !

◘ ◘

ग्रंथसंग्रहालय
क्र. १६५८८
REFBK-0016589

## ही पूरक पुस्तकेही वाचा

- **भारतातील जातीयवादाची समस्या**
  डॉ. महेश्वर करंदीकर
  रु. १.००

- **भारतीय मुस्लिम : आव्हान आणि आवाहन**
  एस् ई. हसनैन
  रु. ३.००

साधना प्रकाशन पुणे २